| लातूर | वर्ष ३५ वे | अंक २४ वा | मंगळवार, दिनांक ०७ एप्रिल २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)    कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## राज्य मंत्रिमंडळाचे ५ धडाकेबाज निर्णय

### महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग स्थापन



**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात राज्यातील स्थितीचा आढावा घेत मंत्रिमंडळाने विकासाशी संबंधित ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग स्थापन करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचाही समावेश आहे. या निर्णयांमुळे राज्याच्या डीजिटल गव्हर्नन्सला गती मिळण्याचा अंदाज आहे. सरकारने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यासही मंजुरी दिली आहे.

**मंत्रिमंडळाचे निर्णय संक्षिप्त स्वरुपात**

**माहिती तंत्रज्ञान विभाग:–**

महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग. विकसित भारत २०४७ मधील विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टाच्या पुर्तीसाठी महत्वाचे पाऊल. माहिती तंत्रज्ञान संचालनायाचे रुपांतर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता आयुक्तालयात होणार. मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय व सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरुपी पदांचा समावेश असलेले नवीन माहिती तंत्रज्ञान संवर्ग निर्माण होणार. राज्यातील माहिती तंत्रज्ञान, एआय, डीजिटल गव्हर्नन्सला गती लाभणार.

**नियोजन विभाग:–**

महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर आता कंपनी. सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी रद्द करुन कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ८ अंतर्गत कंपनी स्थापन होणार. या निर्णयामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार – पाणलोट विकास, डोंगरी विकास योजना, ई–पंचनामा, महा अग्री टेक, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन, खनिच व खाणींचा अभ्यासाला गतीमानता लाभणार.

**नियोजन विभाग:–**

भू–स्थानिक तंत्रज्ञानचा वापर करुन प्रशासनात गतिमानता आणण्याकरिता महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) कंपनी स्थापन होणार. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, भूस्थानिक नवोप्रक्रम व उद्योजकता विभागामुळे विद्यार्थी, व्यावसायिक, संशोधकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबविता येणार.

**ऊर्जा विभाग:–**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी – महावितरणची आर्थिक पुनर्रचना होणार. शासन हमी असलेल्या कर्जा (३२,६७९ कोटी) साठी भांडवली बाजरात सरकारी रोखे येणार. याशिवाय कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन करण्यात येणार. तसेच महावितरण कंपनी भांडवली बाजारात सूचीबद्ध होणार.

**आपत्ती व्यवस्थापन विभाग:–**

महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यास मंजुरी. आपत्ती व्यवस्थापनात खाजगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारणार. यात जागतिक बँकेकडून १६५ कोटींचा निधी मिळणार. आपत्तीचा फटका बसलेल्या नागरीकांना गृह कर्जात तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत तसेच विमा सुरक्षा उपलब्ध होणार. पुराच्या पाण्याचा निचऱ्यासाठी कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी शहरांसह, कृष्णा खोऱ्यातील पूराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येणार.

## मान्सूनबाबतचा महत्त्वाचा अंदाज



**मुंबई/प्रतिनिधी :** एप्रिल महिन्यात देशातील बहुतांश राज्यांमध्ये वादळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. मार्च महिन्यातही अशीच स्थिती पाहायला मिळाली होती. सध्या वातावरणात काही बदल होऊन पावसाचं प्रमाण कमी होत असून उष्णता वाढण्याचा प्राथमिक अंदाजाही वर्तवण्यात आला आहे. याचदरम्यान यंदाच्या वर्षी पावसाचं प्रमाण कसं राहील, मोसमी वाऱ्यांचा मुक्काम कसा असेल आणि देशात मान्सूनची काय परिस्थिती असेल याचा प्राथमिक अंदाज समोर आला आहे.

स्कायमेट या खासगी हवामान संस्थेनं नुकतंच २०२६ या वर्षासाठीचा मान्सूनचा अंदाज वर्तवला आहे. ज्यामध्ये या वर्षभरात मान्सूनचं प्रमाण सामान्यहून कमी राहण्याची प्राथमिक शक्यता सांगितली आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांदरम्यान मान्सूनचं प्रमाण सरासरी ८६८.६ मिमी म्हणजेच ९४ टक्के राहण्याचं पूर्वानुमान आहे. ही आकडेवारी सरासरीच्या +/– ५ टक्के असल्याचं सांगण्यात येत आहे. त्यामुळं ९० टक्क्यांहून अधिक पाऊस पडणार म्हणून आनंदी व्हायचं की सरासरीहून कमी पाऊस पडणार म्हणून चिंता करायच, हाच प्रश्न पडत आहे.

मान्सूनचा दुसरा टप्पा सर्वाधिक अनियमित आणि अस्थिर राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय महासागर डायपोलसुद्धा मान्सूनवर परिणाम करु शकतो. ज्यामुळं क्वचितप्रसंगी मान्सूनवर सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता असल्यानं मान्सूनची सुरुवात चांगली राहते का, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. तर, दुसऱ्या टप्प्यामध्ये मात्र मान्सूनवर कोणतीही स्थिती प्रभाव पाडताना दिसणार नाही.

**कोणत्या राज्यात किती पाऊस?**

भौगोलिक परिस्थितीमध्ये मध्य आणि पश्चिम भागांमध्ये पावसाचं प्रमाण यंदाच्या वर्षी कमी राहण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा आणि राजस्थानमध्ये पावसाचं प्रमाण यावर्षी सरासरीहून कमी असू शकतं. प्रामुख्यानं ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये हे चित्र पाहायला मिळू शकतं. तर, पूर्व आणि उत्तर पूर्वेकडे मात्र समाधानकारक पाऊस होण्याचा अंदाज आहे.

**वर्षाच्या शेवटी एल निनोचा प्रभाव वाढणार...**

स्कायमेटच्या अंदाजानुसार मान्सूनचं एकंदर प्रमाण ९० ते ९५ टक्क्यांदरम्यान राहील. जे सामान्यहून कमी श्रेणीत गणलं जातं. जानेवारी २०२६ मध्येसुद्धा मान्सूनच्या अंदाजांमध्ये देशात पावसाचं प्रमाण सामान्यहून कमी असेल असं म्हटलं गेलं होतं. हाच अंदाज आताही कायम ठेवण्यात आला आहे.

स्कायमेटचे कार्यकारी संचालक जतिन सिंह यांच्या माहितीनुसार ला नीना नंतर आता पॅसिफिक महासागरामध्ये एछडज तटस्थ झाला आहे. एल निनोच्या प्रारंभी टप्प्यानंतर वर्षअखेरीस ही स्थिती आणखी भक्कम होण्याची शक्यता असल्यानं त्याचा थेट परिणाम मान्सूनवर होताना दिसेल.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.latursamachar.com

### प्रभात किरणे

रूपान रुपवाण,,ती गुणांन
धनवान ऐशी मूर्ती,कैसे
कोण करील बदनाम पद,
पैसा,प्रसिद्धी हव्यास मनी
अति डोळ्या देखी,होताना
स्व जीवन माती

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर
९१-९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



समान नागरी कायदा, एक देश एक निवडणुकीसाठी प्रयत्नशील - PM

### चिमटा



दयाचा

अरूंद रस्ते,
वाढते अतिक्रमण
चौकातील गर्दीमुळे
नियंत्रण मिळविणे
अशक्य आहे !
प्रशासनावर
टीका करणे
निरर्थक आहे!!

## भाजपा स्थापना दिनानिमित्त संवाद कार्यालयात आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण



**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात सोमवारी सकाळी ध्वजारोहण करण्यात आले.

भाजपची स्थापना ६ एप्रिल १९८० रोजी झाली परंतु, याची पायाभरणी १९५१ मध्ये श्यामा प्रसाद मुखर्जी आणि दीनदयाल उपाध्याय यांनी स्थापन केलेल्या भारतीय जनसंघातून झाली. श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेत स्थापन झालेल्या भारतीय जनता पार्टीचा ४७ वा स्थापनादिन लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रभक्ती जनसेवा आणि हिंदुत्व या त्रिवेणी मार्गावर भाजपाचा गौरवशाली इतिहास असून देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत आणि राज्याचे धडाडीचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी संपूर्ण भाजपा परिवार अविरतपणे कार्यरत असल्याचे आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, अनिल भिसे, दीपक वांगस्कर, अमर चव्हाण, वसंत करमुडे, राज जाधव, मारुती शिंदे, बालाजी दुटाळ, बालासाहेब कदम, रमाकांत फ ुलारी, अजय राठोड, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, सुखदेव बर्डे, संजय डोंगरे, बाबुराव कस्तुरे, विलास पाटील यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा – डॉ. विवेक सौताडेकर




**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या शिक्षण प्रक्रियेतील त्रिसूत्री आहेत. आजची पिढी सुशिक्षित करण्याकडे आपला भर असून संस्काराकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वर्तमान स्थितीत विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनता आणि गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. पूर्वीची पिढी आई–वडिलांसाठी प्राण द्यायला तयार होत होती, परंतु आजची पिढी त्यांच्यासुध्दा प्राणावर उठली आहे . विनयशीलता, श्रद्धाभाव आणि संवेदनशीलता या बाबींचा मोठा अभाव जाणवतो आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच शिक्षकांसोबत पालकांनी संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी पुढाकार घेणे नितांत गरजेचे आहे असे प्रतिपादन साहित्यिक तथा इतिहास अभ्यासक डॉ. विवेक सौताडेकर यांनी व्यक्त केले.

लातूर येथील श्री शैक्षणिक संकुलात पालक मेळाव्या करण्यात आले होते. या पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. दिलीप गुंजरगे हे होते याप्रसंगी मंचावर संस्था अध्यक्ष श्रीम. सरस्वती शिंदे, श्री विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्री श्रीम. मनीषा शिंदे गुंजरगे ,संस्था संचालक सौ.मोहिनी चौधरी, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. घाडगे, प्राचार्य मनोज कुलकर्णी,प्राचार्य माने, प्रा.खंदारे, मोहिते सर आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मनीषा शिंदे यांनी केले. याप्रसंगी विविध स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात डॉ. दिलीप गुंजरगे म्हणाले की, शाळा आणि पालक हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करताना दिसून यावेत. पालकांनी आपला पाल्य कमीत कमी मोबाइलचा उपयोग करेल याकडे लक्ष दिले पाहिजे. सध्या मुले वाचन व स्वयंअध्ययन विसरले आहे. हे घटक मुलांमध्ये निर्माण करण्यासाठी पालक व शाळेने प्रयत्न केले पाहिजेत असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल गायकवाड तर आभार किरण जगताप यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## शिरूर अनंतपाळ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता बैठकीत वादाचा सामोपचाराने निपटारा

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मौजे आरी येथे गतवर्षी उद्भवलेल्या वादाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी आज दिनांक ६ एप्रिल २०२६ रोजी शिरूर अनंतपाळ येथे पंचायत समिती कार्यालयात सकाळी ११.३० ते दुपारी १.०० या वेळेत शांतता बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रविंद्र चौधर, तहसीलदार श्री. यादव, गटविकास अधिकारी श्री. वरंडेकर, पोलीस निरीक्षक श्री. भंडे, ग्रामसेवक एकुरके, तसेच मौजे आरी येथील दोन्ही गटांतील समाज बांधव, सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मौजे आरी येथे गतवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या वेळी झेंडा लावण्याच्या ठिकाणावरून दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला होता. या वादामुळे गावातील शांतता व सामाजिक ऐक्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर यावर्षीचा उत्सव शांततेत व सलोख्याने पार पडावा यासाठी प्रशासनाने पुढाकार घेत सदर शांतता बैठकीचे आयोजन केले. बैठकीदरम्यान दोन्ही गटांच्या प्रतिनिधींना आपापले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. दोन्ही बाजूंचे मुद्दे संयमाने व निष्पक्षपणे ऐकून घेत प्रशासनाच्या वतीने परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला. परस्पर संवाद व समन्वयाच्या माध्यमातून गैरसमज दूर करून वादाचा मूळ मुद्दा समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रविंद्र चौधर यांनी मार्गदर्शन करताना गावातील शांतता व कायदा सुव्यवस्था राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे नमूद केले. कोणत्याही प्रकारच्या अफवा, गैरसमज किंवा उत्तेजनात्मक कृतींना बळी न पडता सर्वांनी संयम बाळगावा व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच तहसीलदार व इतर मान्यवरांनीही सामाजिक ऐक्य, बंधुभाव व परस्पर सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित करत, गावातील परंपरा व संस्कृती जपून एकत्रितपणे सण–उत्सव साजरे करण्याचे आवाहन केले. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सकारात्मक वातावरण निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.सखोल चर्चेनंतर दोन्ही गटांनी परस्पर सहमतीने वाद मिटवण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव पारंपरिक पद्धतीने समाजमंदिरात सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीत शांततेत व उत्साहात साजरा करण्यात येईल, असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.



या बैठकीमुळे मौजे आरी गावात सलोखा व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून संभाव्य तणाव पूर्णतः निवळला आहे. आगामी उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाकडून योग्य तो बंदोबस्त ठेवण्यात येणार असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. सदर शांतता बैठकीमुळे प्रशासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ झाला असून सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे. गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव शांततेत, आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## युद्धामुळे संकटाबरोबर चिंताही वाढली....

अमेरिका हा ईस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून इराणाशी लढत असला तरी इराण हा हार मानायाला तयार नाही. तो जिद्दीने लढत आहे. अमेरिका हा महासत्ताधीश आहे. सर्व संपन्न देश आहे. प्रगतीसर्व बाबतीत केली आहे. जगावर वचक आहे तरी इराण घाबरत नाही. इराण जिद्दीने लढत आहे. मुस्लीम राष्ट्र इराणाला मदत करीत नाहीत. जगाच्या पाठीवर अनेक राष्ट्र ईस्लामीक आहेत. लहान आहेत. ते मिळून नाहीत. एकमेका विरूद्ध लढत आले आहेत. शांतात अजिबात दिसून येत नाही. त्यामुळे अमेरिका हा इराणाशी लढत असून त्याला खणीज संपन्न व्हायचे आहे. युद्ध थांबेल व जागतिक देश नि:श्वास सोडतील असे वाटत नाही. वरचेवर अमेरिका हा अधिक तिव्र बनत आहे. त्यामुळे सर्वबाबीकडे लक्ष ठेवून भारताची वाटचाल सुरु आहे. भारतात अजून तिव्र अशी कोणतीही टंचाई दिसून येत नाही. पेट्रोल व डिझेलची टंचाई नाही मात्र काही प्रमाणात गॅस टाकीची टंचाई भासत आहे. वास्तविक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला आता पुन्हा एकदा धमकीवजा इशारा दिला आहे. आता शांतता करार झाला नाही तर संपूर्ण इराण बेचिराख करुन टाकू असे आता डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणने युद्ध थांबवले नाही तर आम्ही नागरिकांचा विचार करणार नाही. इराणच्या पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधांवरही आम्ही हल्ला करु आणि संपूर्ण इराण उद्धस्त करु असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर २८ फेब्रुवारीला हल्ला केला. त्यानंतर दोन आठवड्यात हे युद्ध संपवून टाकू असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. मात्र इराणने प्रत्युत्तरादाखल जे हल्ले केले त्यामुळे मागील पाच आठवड्यांपासून हे युद्ध सुरु आहे. इराणने प्रत्युत्तरादाखल स्ट्रेट ऑफ होर्मुज बंद केले आहे. जगातले २० टक्के कच्चे तेल ज्या मार्गातून जाते तो हा मार्ग आहे. त्यामुळे हा संघर्ष टीकेला पोहचला आहे. दरम्यान आता डोनाल्ड ट्रम्प यांनी संपूर्ण इराण बेचिराख करुन टाकू असा इशारा इराणला दिला आहे. एवढच नाही शांती करार केला नाही तर तुमचे उर्जा प्रकल्प, पायाभूत सुविधा उडवून टाकू असा इशाराही ट्रम्प यांनी इराणला दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, पॉवर प्लांट डे आणि ब्रिज डे ठरेल. यापेक्षा दुसर काहीही नसेल. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करा, अथवा तुम्ही नरकात जाल. तुम्ही पाहतच बसा, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्धाची ठिगणी पडल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वाचे विधान केले होते. इराणबरोबरचा आमचा संघर्ष चार ते पाच आठवडे सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. यादरम्यान युद्धाला पाच आठवडे पूर्ण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर ट्रम्प म्हणाले की, अमेरिकेची लष्करी उद्दिष्टे लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. पुढील दोन ते तीन आठवड्यात अमेरिकेकडून इराणवर आणखीनच तीव्र हल्ले केले जातील. त्यांच्या या विधानामुळे पश्चिम आशियात भडकलेले युद्ध सुमारे आठ आठवड्यांपर्यंत चालू राहण्याची शक्यता आहे. याचाच अर्थ इराण आणि संपूर्ण जगाला एका दीर्घकालीन संघर्षासाठी तयार राहावे लागणार आहे. जागतिक शांतत संघटना आहेत त्या नावालाच दिसून येतात. अशा संघटनेनी पुढाकार घेवून मध्यस्थ शोधला पाहिजे. काही झाले तरी युद्ध परवडणारे नाही. याची माहिती असून ट्रम्प हा आगावूपना करीत आहेत. ट्रम्पने आज पर्यंत दुसऱ्यादा अमेरिकेचे सुत्र हाती घेतल्यापासून जागतिक अशांतता माजविण्याचे काम केले आहे. कधी मोठ्या प्रमाणात टॅरिफ लावण्याचे काम केले आहे. मुळात कधी कोणता निर्णय घेतील हे सांगता येत नाही. अशा वागण्यामुळे खुद अमेरिकेतील नागरिक नाराज दिसून येत आहे. कधी ट्रम्प यांची कारकिर्द संपेल याची वाट पाहात आहेत. जागतिक स्तरावरील देश ट्रम्प यांच्या कारभारावर कंठाळले आहेत. एक लहान देश इराण असून अमेरिकेला झुंजवत आहे. अमेरिकेला काही प्रमाणात जिरीस आणले आहे. अमेरिका स्वत:ला महासत्ताधिश समजत असला तरी प्रत्यक्षात इराण हा झुंजावत आहे. परेशान करीत आहे. त्यामुळे भारताने सावध पवित्रा घेतला असून आपला स्वार्थ साधत आहे. एक तर जगात भारताशी सर्वांची मैत्री आहे. मदतीची साथ देत आला आहे. त्याच प्रमाणे ईराणामधील युद्धात जे जखमी झाले आहेत त्यांच्यासाठी भारताने औषधे पाठविली आली आहेत. मानवतेच्या दृष्टिने जेवढे करता येईल तेवढे करण्याचा प्रयत्न भारताकडून होत आहेत. देशात गॅसची टंचाई तशी अधिक नाही. मर्यादित वापर नागरिकाडून होत आहे. त्यामुळे भयाण अशी स्थिती भारतात नाही. गॅस,इंधनाची पुर्तता करण्यासाठी इतर देशातून ती मागवुन पुर्तता केली जात आहे. भारताला कोणतीही अजून झळ बसत नसली तरी अमेरिका सतत काही तरी चुकीचे वक्तव्य करीत आहेत. आज पर्यंत अमेरिकशी सर्वांचे संबंध चांगले होते. ट्रम्प यांनी अमेरिकेचे सुत्र हाती घेताच ते गोंधळलेले दिसून येतात. कधी काय बोलतील हे सांगता येत नाही. सतत काही तरी बोलून अंगलट बाबी घेत आहेत. इराण अजूनही तग धरून आहे. तो शरण जात नाही. अमेरिकेला प्रतित्तर देत आहे. हार्मुझ बंदरावरून वेठीस आणत आहे. तो खुला करावा अशी मागणी होताना दिसून येत आहे. हा मार्ग भारतासाठी खुला आहे मात्र अमेरिका व दुष्मन राष्ट्रासाठी बंदी आहे. अशा स्थितीत अमेरिका चिडला आहे. मुळात युद्ध सध्याच्या परिस्थितीत परवडणारे नाही. यात मोठी आर्थिक नुकसान होत आहे. अमेरिकेचे लढावू विमान पाडले गेले आहे. इराणाचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक इमारती उध्वस्थ झाल्या आहेत. जीवन जगण्यात आडथळे येत आहेत. भयभीत जनता झाली आहे. अशा स्थितीत इराण माघार घेत नाही. अमेरिकेचा वाढता दबाव चालू आहे. अमेरिका हा अजूनही युद्ध समाप्तीची घोषणा करीत नाही. किमान जगासाठी तरी करणे अपेक्षित आहे. युद्धात आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. युद्ध पुर्वी सारखे नाही. समोरसमोर लढले जात नाही, हवाई हल्ले मोठ्या प्रमाणात केले जात आहे. या युद्धात अजूनही तिसरा पडला नाही. रशिया असो किंवा चीन अलिप्त आहेत. भारताने सावध पवित्रा घेतला आहे. भारताने जी पावले उचलली आहेत ती योग्य आहेत. युद्धामुळे संकट निर्माण झाले असले तरी चिंता व्यक्त केली जात आहे. कधी युद्ध संपते असे सर्वांना वाटत आहे. ट्रम्प यांना युद्धाची खुमखमी का निर्माण झाली असेल असा प्रश्न निर्माण होत आहे. अमेरिकेला माहिती आहे की, मोठ्या प्रमाणात ईस्लामिक राष्ट्र असले तरी ते काही वाकडे करू शकत नाहीत. त्यामुळे अमेरिका आज जरी माघार घेत नसला तरी आगामी काळात काही दिवसासाठी युद्ध विराम करू शकतो अशी स्थिती दिसून येत आहे.

# पोहेगाव येथे कर्करोग निदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; ५५९ रुग्णांची तपासणी, ८ जणांना पुढील उपचारांचा सल्ला




**पोहरेगाव/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीणचे युवा नेते तथा माजी आमदार धीरजभैय्या देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पोहेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या 'मोफत कर्करोग निदान शिबिरास' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे सर्वात महत्त्वाचे यश म्हणजे तपासणी दरम्यान ३ रुग्णांमध्ये कर्करोगाची लक्षणे आढळून आली असून त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत, तर ८ संशयित रुग्णांना पुढील सखोल निदानासाठी 'बायोप्सी' चाचणीकरिता पाठवण्यात आले आहे.

या प्रसंगी जि.प. सदस्य आशाताई भिसे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद आबा जाधव, रेणा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रवीण पाटील, माजी जि.प. सदस्य उद्धवराव चेपट, माजी पंचायत समिती सभापती रमेशराव सोनवणे, प.स. सदस्य तातेराव वाघमारे, रेणापूर बाजार समितीचे माजी सभापती रमेशराव सूर्यवंशी, बिबीशन कदम, रेणा संचालक तानाजी कांबळे, उमाकांत देशमुख, इंगळे,धनंजय देशमुख, शिरीष यादव, महादेव सोनवणे, सदानंद शिंदे, राजेभाऊ कारसकर, भरतभाऊ मोरे, संतोष शिंदे, उपसरपंच शालिवाहन सरवदे, संजय हरिदास, निशांत मोरे, सुधाकरराव होळकर, चंद्रकांत राठोड, छत्रभुज यादव, भगीरथ घाटोळे, विशाल मोरे, माणिकराव शिंदे, अशोक आंबिलगे, रामदास कदम, संजय चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात एकूण ५५९ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये ३४२ महिला व २१७ पुरुषांचा समावेश होता. विशेषतः १३६ महिलांची 'व्हीआयए' (तख-) तपासणी करण्यात आली. वेळेत निदान झाल्यामुळे बाधित रुग्णांना योग्य उपचार मिळण्यास मोठी मदत झाली आहे. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र पोहेगाव येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. भालचंद्र चाकूरकर, डॉ. अभिजीत गुंजरगे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आकांक्षा काळे, डॉ. सुरवसे, डॉ. लोहारे तसेच आरोग्य सहाय्यक इंगळे, श्रीमती नागटिळक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्रीमती पवार, औषध निर्माण अधिकारी श्री. दुधाळे व सर्व उपकेंद्रातील आरोग्य सेवक-सेविका, आशा गट प्रवर्तक व आशा कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. वाढदिवसाचे औचित्य साधून राबवण्यात आलेल्या या आरोग्यदायी उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

या शिबिराचे आयोजन लातूर जिल्हा परिषद सदस्य सौ. मनीषा गंगासिंह कदम यांनी केले होते. नागरिकांनी अशा उपक्रमांचे स्वागत करून भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# हृदयविकाराच्या झटक्याने एखाद्याचे प्राण वाचवण्याकरिता हे करा

अयोग्य जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे अनेक लोक हृदयाशी संबंधित आजारांनी ग्रस्त आहेत. अलिकडच्या काळात हृदयविकार आणि स्ट्रोकच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही चिंतेचा विषय बनली आहे. एक काळ असा होता, जेव्हा हृदयविकाराचे झटके फक्त वृद्धांमध्येच सामान्य होते, परंतु आज तरुण लोक आणि मुले देखील हृदयविकाराच्या झटक्याने आपले प्राण गमावत आहेत. या लेखात, छातीत दुखणे किंवा हृदयविकाराची लक्षणे आढळल्यास काय करावे ते जाणून घेऊया...

या सूचनांचे पालन करताना काळजी घ्या: छातीत दुखणे आणि हृदयविकाराच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अशा वेळी काही खबरदारी ताबडतोब घेणे गरजेचं आहे, अन्यथा ते प्राणघातक ठरू शकतात. जर तुम्हाला छातीत दुखणे किंवा कोणतीही अस्वस्थता जाणवत असेल तर विलंब न करता वैद्यकीय मदत घ्या. जवळील रुग्णालयाशी ताबडतोब संपर्क साधा.

जर तुम्हाला छातीत दुखत असेल तर घाबरू नका; एका ठिकाणी शांत बसा आणि शांत राहण्याचा प्रयत्न करा. कारण ताण आणि चिंता हृदयरोग वाढवू शकतात. जर तुमच्या समोरची व्यक्ती बेशुद्ध झाली असेल किंवा हृदयविकाराच्या झटक्याने श्वास घेत नसेल तर ताबडतोब सीपीआर द्या. यासाठी त्यांच्या छातीच्या मध्यभागी दोन्ही हातांनी दाबणे आवश्यक आहे. जर ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर (अए) उपलब्ध असेल तर ते निर्देशानुसार वापरावे. अए हृदयाची लय पुनर्संचयित करण्यास मदत करते. आवश्यक असल्यास इलेक्ट्रिक शॉक देखील देऊ शकता. लक्षात ठेवा की प्रत्येक छातीत दुखणे हे हृदयविकाराचा झटका किंवा हृदयविकाराच्या झटक्याचे लक्षण नसू शकते. छातीत दुखण्याची इतर कारणे देखील असू शकतात, जसे की स्नायूंचा ताण, मानसिक ताण आणि अपचन. परंतु, छातीत दुखणे कधीही हलके घेऊ नये. ताबडतोब वैद्यकीय मदत घेणे चांगले.

हृदयविकाराची लक्षणे

हृदयविकाराची लक्षणे व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असतात. त्यात खालील कारणं समाविष्ट असू शकतात.

अचानक छातीत दुखणे किंवा अस्वस्थता

वेदना जी डाव्या किंवा उजव्या हातापर्यंत किंवा मान, जबडा, पाठ किंवा पोटापर्यंत पसरू शकते. काही लोकांना तीव्र वेदना किंवा कडकपणा जाणवतो, तर काहींना अस्वस्थता जाणवते. तसंच ते अपचनाच्या बाबतीत घडणाऱ्या वेदनांसारखेच, जास्त दाब किंवा जळजळ जाणवू शकते.

आजारी वाटणे, घाम येणे, चक्कर येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे.

इतर सामान्य लक्षणांमध्ये हे समाविष्ट आहे

अचानक चिंता वाटणे जी पॅनिक अटॅकसारखी वाटू शकते.

फुफ्फुसांमध्ये द्रव जमा झाल्यामुळे तीव्र खोकला.

हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, काही लोकांना या सर्व लक्षणांशिवाय हृदयविकाराचा झटका येऊ शकतो आणि हे लक्षात ठेवणं महत्त्वाचं आहे की, प्रत्येकाला वेदना वेगवेगळ्या प्रकारे जाणवतात. वृद्ध लोकांमध्ये किंवा मधुमेह असलेल्यांमध्ये हे होण्याची शक्यता जास्त असते, कारण ही स्थिती नसांना नुकसान पोहोचवू शकते, ज्यामुळे वेदना समजण्याची पद्धत बदलते.

# डिजिटल प्रशासनाची नवी दिशा : नांदेड पोलीस परिक्षेत्राचा राज्यात अव्वल ठसा

महाराष्ट्र शासनाने प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राबविलेला १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम हा राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या उपक्रमात नांदेड पोलीस परिक्षेत्राने राज्यात प्रथम क्रम ांक पटकावत केवळ यश मिळवले नाही, तर आधुनिक प्रशासनाचा एक आदर्श नमुना निर्माण केला आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यम ापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याबाबत शनिवार २८ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे.

आजच्या डिजिटल युगात प्रशासनाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून सेवा अधिक जलद, अचूक आणि सुलभ पद्धतीने मिळाव्यात ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या नेतृत्वाखाली नांदेड परिक्षेत्राने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणले.

ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये संकेतस्थळाचे आधुनिकीकरण हा एक महत्त्वाचा भाग ठरला. नव्याने विकसित केलेले संकेतस्थळ अधिक सुरक्षित, सुलभ आणि नागरिकाभिम ुख बनविण्यात आले. विविध शासकीय योजना व सेवा एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आल्या, ज्यामुळे नागरिकांना कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली.

'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. तक्रार नोंदणीपासून ते तिच्या निकाली काढण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करण्यात आली. यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला.

ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करून कागदविरहित कामकाजाला चालना देण्यात आली. फाईल निपटारा जलद गतीने होऊ लागला, तसेच निर्णयप्रक्रियेत विलंब कमी झाला. इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डच्या माध्यमातून अद्ययावत व अचूक माहिती उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य झाले.

नांदेड परिक्षेत्राची खासियत म्हणजे केवळ पारंपरिक सुधारणा न करता नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. 'संवेदना' ही कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित संगणकीय प्रणाली अर्ज चौकशीसाठी सुरू करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना तत्काळ माहिती मिळू लागली. 'एुत एब' प्रणालीद्वारे गुन्हे तपासावर बारकाईने लक्ष ठेवता येऊ लागले, तर 'खबर' हेल्पलाईनमुळे गैरप्रकार आणि अवैध व्यवसायांविरोधात नागरिकांना थेट तक्रार नोंदविण्याचे सशक्त माध्यम मिळाले.

याशिवाय तक्रारदारांच्या समाधानाची पातळी जाणून घेण्यासाठी फीडबॅक प्रणाली सुरू करण्यात आली, हीदेखील एक म हत्त्वपूर्ण पायरी ठरली. यामुळे सेवांची गुणवत्ता सातत्याने सुधारण्यास मदत झाली.

या सर्व उपक्रमांमुळे प्रशासन अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि कार्यक्षम बनले आहे. नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया सुलभ झाल्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी झाली आहे. डिजिटल माध्यमातून संवाद वाढल्यामुळे प्रशासन अधिक विश्वासार्ह बनले आहे.

या यशामागे सक्षम नेतृत्वासोबतच संघभावना आणि सातत्यपूर्ण प्रयत्न म हत्त्वाचे ठरले. पोलीस अधिकारी, अंम लदार, मंत्रालयीन कर्मचारी तसेच तांत्रिक तज्ज्ञ यांच्या समन्वयातून हा बदल शक्य झाला. सॉफ्टवेअर अभियंत्यांनी विकसित केलेल्या प्रणालींमुळे प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाला गती मिळाली.

यापूर्वी १०० दिवसांच्या कृती आराखड्यात नांदेड परिक्षेत्राने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला होता. त्यामुळे सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याची परंपरा या परिक्षेत्राने जपली आहे. १५० दिवसीय कार्यक्रमात मिळालेला प्रथम क्रमांक ही त्या प्रवासातील महत्त्वाची पायरी आहे.

नांदेड पोलीस परिक्षेत्राची ही यशोगाथा इतर शासकीय विभागांसाठी प्रेरणादायी ठरावी, अशी अपेक्षा आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रभावी नियोजन आणि नागरिककेंद्रित दृष्टीकोन यांच्या मदतीने प्रशासन अधिक सक्षम कसे होऊ शकते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भविष्यात अशाच नाविन्यपूर्ण उपक्रम ांच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि जनतेच्या अपेक्षांना पूरक ठरेल यात शंका नाही. नांदेड परिक्षेत्राने घालून दिलेला हा आदर्श राज्याच्या डिजिटल प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.

**– अलका पाटील**

# भावनांवर नियंत्रण ठेवता येत नाही? तज्ज्ञांनी सांगितलेल्या या टिप्स फॉलो करा

काही विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण न झाल्यामुळे दु:खी होऊन आत्महत्या करतात. तर काहींना लहान-लहान गोष्टींवरून राग येतो आणि त्यांचा बीपी वाढतो. आपल्यापैकी काहींना आपल्या आवडत्या लोकांकडून काहीतरी अपेक्षा असते आणि त्या अपेक्षा पूर्ण न झाल्यास आपण दु:खी होतो. प्रत्येकाच्या मनात आनंद, दु:ख, राग, भीती, चिंता अशा अनेक भावना असतात. जर त्या योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात मांडल्या गेल्या तर काही हरकत नाही. पण, जर त्या नियंत्रणाबाहेर गेल्या तर माणूस आपला विवेक गमावतो. मानसशास्त्रज्ञ म्हणतात की, याचा विचार, कृती आणि मानवी नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होतो. म्हणूनच, असं म्हटलं जातं की, भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कारण यामुळे अनेक समस्या आपोआप सुटतात. आता कसे ते जाणून घेऊया!

**सेल्फ रेगूलेशन:** जेव्हा एखाद्याला राग येतो, तेव्हा ते लगेच कृतीतून दाखवात. तसंच जेव्हा आवडत नसलेली एखादी घटना घडते तेव्हा आपल्याला दु:ख होते. अशा भावना दाखवणे साम ान्य आहे. परंतु, आजच्या पिढीतील तरुणांमध्ये संयम नाही. ते गरजेपेक्षा जास्त भावना दाखवतात. त्याचे परिणाम नकारात्मक होत आहेत. म्हणून सेल्फ रेगूलेशन आता आरोग्यदायी शब्द बनला आहे. सेल्फ रेगुलेशन म्हणजे जीवनातील कोणत्याही परिस्थितीवर अतिरेकी प्रतिक्रिया न देण्याची आणि आरोग्यावर परिणाम न करण्याची प्रक्रिया. या विषयावर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चर्चा सुरू आहे.

**जर नियंत्रित नसेल तर?:** भावना असणे यामध्ये काही अडचण नाही असे तज्ज्ञांचं म्हणणं आहे, परंतु त्या ज्या पद्धतीने मांडल्या जातात तीच समस्या आहे. असं म्हटलं जातं की, जेव्हा हे नियंत्रित करता येत नाही, तेव्हा क्षणार्धात आपल्याकडून चूकीच्या गोष्टी घडतात. कधीकधी आत्महत्या आणि खून देखील होतात. तसंच, काही इतर प्रकरणांमध्ये, एखाद्या शब्दाचा विचार करून माणूस विचलित होतो. राग आल्यावर विचार न करता शिव्या देतो, नंतर पश्चात्ताप करतो. जेव्हा कोणी जे बोलतो आणि ते करत नाही तेव्हा बोलणे थांबवा. राग आल्यावर, बराच वेळ झोपणे, तासन्तास सोशल मीडियावर रमणे, जास्त खाणे, कधीतरी घडलेल्या घटनांचा उल्लेख करून वाद घालणे अशा कृती टाळा. कारण यामुळे निद्रानाश, पचन समस्या, बीपी आणि हृदयविकाराचा झटका आदी समस्यांचा धोका वाढतो.

**कसे नियंत्रित करावे? :**

जेव्हा तुम्ही भावनिक होता तेव्हा ते पुस्तकात लिहा. तुम्हाला राग का येतो? त्याचे कारण काय? भीती वाटते का? कंटाळा येतो का? तुमच्या भावनेला नाव दिल्याने तिची तीव्रता खूप कमी होते.

कोणी थेट किंवा संदेशाच्या स्वरूपात काहीही बोलले तरी लगेच प्रतिक्रिया देऊ नका. शांतपणे आणि खोलवर विचार करण्यासाठी १० मिनिटे, एक तास किंवा एक दिवस द्या . कारण 'ते' या शब्दांना लगेच प्रतिसाद दिल्यास गोंधळ निर्माण होऊ शकतो. परिणामी तुम्हाला नंतर पश्चात्ताप करावा लागेल.

हार्वर्ड हेल्थ पब्लिशिंगच्या एका अभ्यासात असं म्हटलं आहे की, जेव्हा भावना तीव्र असतात, तेव्हा एक दीर्घ श्वास घ्या आणि ताबडतोब सोडा, थोडे चाला, पाणी प्या आणि थंड पाण्याने चेहरा धुवा.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सीमा निश्चित करा. वाद घालण्यात वेळ वाया घालवू नका.

इतर तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकतात असे समजू नका. पालक, मित्र, जोडीदार आणि इतर लोक तुमची परिस्थिती समजून घेतील. नियंत्रण घेण्याची जबाबदारी तुमची आहे.

# रत्नागिरी पोलिसांची 'डिजिटल' भरारी

प्रशासनात तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर आणि जनसामान्यांच्या सुरक्षेसाठी राबवलेले नाविन्यपूर्ण उपक्रम यांमुळे रत्नागिरी पोलीस दलाने राज्याच्या नकाशावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. राज्य शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गर्व्हनन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत रत्नागिरीचे पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यातील ३४ सर्वोत्तम पोलीस अधीक्षक कार्यालयांच्या मूल्यमापनात रत्नागिरी पोलीस अधीक्षक कार्यालयाने पाचवा क्रमांक पटकावून प्रशासकीय उत्कृष्टतेचा नवा मापदंड प्रस्थापित केला आहे.

तंत्रज्ञानाची जोड आणि मानवी चेहरा

केवळ गुन्हेगारी नियंत्रणच नव्हे, तर सर्वसामान्यांच्या जीवनात पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करण्यासाठी नितीन बगाटे यांनी २४ हून अधिक लोकाभिमुख उपक्रम सुरू केले आहेत. यात कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि व्हॉट्सअप चॅटबॉट यांसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करण्यात आला आहे.

**सुरक्षेची नवी कवचकुंडल: प्रमुख उपक्रम**

मिशन जीवन: जिल्ह्यातील ५० हजारांहून अधिक एकाकी ज्येष्ठ नागरिकांची माहिती संकलित करून, त्यांच्या वाढदिवशी प्रत्यक्ष घरी जाऊन शुभेच्छा देण्याचा हा उपक्रम पोलिसांचा 'संवेदनशील चेहरा' समोर आणतो.

रेड्स ॲप: गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी अघ चा वापर करणारे हे ॲप अत्यंत प्रभावी ठरत आहे. याद्वारे बेपत्ता व्यक्तींचा शोध आणि अनोळखी मृतदेहांची ओळख पटवणे सुलभ झाले आहे.

**रत्नसेतू चॅटबॉट:** एका क्लिकवर पोलीस सेवा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम नागरिकांसाठी 'डिजिटल हेल्प डेस्क' ठरला आहे.

**बंदोबस्त ॲप:** पोलीस कर्मचाऱ्यांचे लाईव्ह ट्रॅकिंग आणि बंदोबस्ताचे अचूक नियोजन यामुळे जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था अधिक शिस्तबद्ध झाली आहे.

**मिशन संवेदना:** महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांचा अवघ्या ४८ तासांत तपास पूर्ण करण्यावर या मिशनचा भर आहे.

तपास प्रक्रियेत पारदर्शकता आणि गती

तक्रारदारांना आपल्या केसचे काय झाले, हे जाणून घेण्यासाठी आता पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवावे लागत नाहीत. 'मिशन प्रगती' अंतर्गत फिर्यादींना तपासाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती एसएमएसद्वारे दिली जाते. तसेच 'मिशन गती' मुळे प्रलंबित गुन्ह्यांच्या निकालाचा वेग प्रचंड वाढला आहे.

''पोलीस दल हे केवळ धाक दाखवणारे यंत्र नसून ते नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असलेले मित्र आहे, हे या उपक्रमांतून सिद्ध झाले आहे.''

डिजिटल गाववारी, मिशन फिनिक्स (अंमली पदार्थ विरोधी मोहीम) आणि मिशन सायबर जागृती यांसारख्या उपक्रमांनी रत्नागिरी जिल्ह्याला सुरक्षिततेचे एक नवे वलय प्राप्त करून दिले आहे. ई-गर्व्हनन्सच्या माध्यमातून पोलीस प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम कसे होऊ शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखालील रत्नागिरी पोलीस दल होय.

**– प्रशांत कुसुम आनंदराव सातपुते**

# निवडणूकी अगोदरच मतदार हरवले कुठे?

निवडणूक आयोगाने सांगितलेले सर्व पुरावे सादर केल्यानंतरही साठ लाख मतदारांच्या नावांची पुन्हा पडताळणी का केली जात आहे? त्यास विलंब का होत आहे? या प्रश्नांची उत्तरे आयोगाने दिली पाहिजेत.

पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदानास अवघे चार दिवस उरले आहेत आणि अजूनही तेथील मतदार यादीचा घोळ संपलेला नाही. मतदार याद्यांच्या विशेष तीव्र पडताळणी मोहिमेतील पहिली मतदार यादी गेल्या महिन्यात जाहीर झाली. राज्यातील सुमारे ६० लाख मतदारांची 'पडताळणी' बाकी असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले. सर्व कागदपत्रे असूनही आपले नाव यादीत नसल्याची तक्रार अनेक नागरिकांनी केली आहे. या नावांची पडताळणी करण्यासाठी माल्डा येथे एक केंद्र उघडण्यात आले होते. नागरिक तेथे गेले; पण 'इतर कामे' असल्याचे सांगत तेथील अधिकार्यांनी नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. संतप्त नागरिकांनी सात अधिकार्यांना घेराओ घालून ओलीस ठेवले. याची दखल सरन्यायाधीशांनी घेतली व राज्य सरकारची कान उघाडणी केली. माल्डामधील हिंसक घटना पूर्वनियोजित होती, असा आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे. भाजप, काँग्रेस व ओवैसी यांचा एआयएमआयएम यांनी संगनमताने अशांतता निर्माण केली, असाही त्यांचा आरोप आहे.



निवडणुकीच्या काळात असे आरोप-प्रत्यारोप होत असतात असे गृहित धरले तरी, विशेष पडताळणीनंतर लाखो मतदारांचे नाव यादीत का नाही? हा मुख्य प्रश्न आहे. सर्वोच्च न्यायालयाने येथे लक्ष घालणे आवश्यक आहे.

आयोगाची संशयास्पद भूमिका

ज्यांचे नाव यादीत नाही अशा मतदारांची पडताळणी करण्यास निवडणूक आयोगाने १९ लवाद स्थापन केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर ते स्थापन झाले हे महत्त्वाचे आहे. त्याचे कोलकात्यातील कार्यालय पहिल्याच दिवशी बंद होते. तेथील 'शांतता' आणि माल्डामधील 'अशांतता' यांचा थेट संबंध आहे. निवडणूक आयोगाच्या निष्क्रियतेमुळे ही समस्या निर्माण झाली आहे. मतदानाच्या तारखेपूर्वी आपले नाव यादीत आले नाही, तर मतदान करणार कसे? हजारो मतदारांची ही चिंता अनाठायी नाही. प्रत्येक पात्र नागरिकास मतदानाचा अधिकार घटनेने दिला आहे. यादीत ज्यांचे नाव नाही ते नागरिक या हक्कास मुकणार आहेत. निवडणूक आयोगाची 'पडताळणी' संथ गतीने होत आहे हे त्याचे कारण आहे. नावे यादीत 'समाविष्ट' करण्यासाठी मतदार याद्यांची सुधारणा होणे अपेक्षित असते. पात्र मतदारांना 'वगळण्यासाठी' ती नसते हा मुद्दा निवडणूक आयोगाने लक्षात घेतला आहे का? की नावे वगळण्यासाठी त्यांना कोणी सूचना दिल्या आहेत? हे प्रश्न बंगालमधील विशेष पडताळणी मोहिमेमुळे उपस्थित होतात. बिहारपेक्षा बंगालमधील ही मोहीम गुंतागुंतीची बनल्याचे आढळत आहे. मतदार नोंदणी अधिकार्यांच्या मदतीसाठी निवडणूक आयोगाने गेल्या डिसेंबरमध्ये आठ हजारांपेक्षा जास्त केंद्रीय कर्मचार्याची नियुक्ती केली. नोंदणी अधिकार्यांचे अधिकार ते हिरावतील का? अशी शंका त्यामुळे निर्माण झाली आणि प्रशासकीय पेच उभा राहिला. अनिर्णित प्रकरणांच्या सुनावणीसाठी पाचशेपेक्षा जास्त न्यायालयीन अधिकार्यांची नेमणूक सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारीत केली; पण निर्णयासाठी मुदत दिली नव्हती; पण मतदानाच्या तारखेपूर्वी मतदार याद्या अद्ययावत करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. मतदार कमी होण्याची कारणे त्यांनी देणे गरजेचे आहे. जे मतदार त्यांच्या घरी आहेत, ज्यांचे नाव आधीच्या मतदार यादीत होते अशांची नावे नव्या यादीत का नाहीत? याचे योग्य उत्तर आयोगाने दिले पाहिजे. एका माजी न्यायाधीशांनी त्यांचे नाव यादीत नसल्याचे जाहीर केल्याने आयोगाच्या कार्यक्षमतेवर शंका येणे स्वाभाविक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सततच्या हस्तक्षेपामुळे व देखरेखीमुळे बिहारमधील मतदार याद्यांची विशेष पडताळणी व नंतरची निवडणूक बरीच शांततेत पार पडली; मात्र बंगालमधील ही पडताळणी प्रथमपासून वादग्रस्त ठरली. निवडणूक आयोगाच्या भूमिकेबद्दल त्यामुळे शंका उपस्थित झाली. हजारो मतदार आपले नाव समाविष्ट करण्यासाठी गर्दी करत असताना त्यांचे नाव यादीत नसणे अनाकलनीय आहे. हे लाखो मतदार कोठे हरवले? सर्वोच्च न्यायालयाने यात पुन्हा लक्ष घालणे आवश्यक आहे.

# व्यसन समाजमाध्यमांचे..

डिजिटल युगात 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म्स ही केवळ संवादाचे माध्यम राहिलेली नाहीत, तर किशोरांचे व्यक्तिमत्त्व, विचारसरणी आणि वर्तनावर ते खोलवर परिणाम करतात. त्यामुळे युवा पीढी समाज माध्यमांच्या 'व्यसना'त अडकत आहे. सरकार किंवा न्यायव्यवस्था या मंचांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत ,त्याकडे सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

ऑस्ट्रेलियाने देशातील मुला-मुलींच्या समाज माध्यमाच्या ('सोशल मीडिया') वापरावर मर्यादा आणण्यासाठी निर्बंध लागू केले. ब्रिटनही सध्या एक पथदर्शक कार्यक्रम राबवत आहे. त्यात १६ वर्षांखालील मुलांसाठी 'सोशल मीडिया'वर बंदी कितपत प्रभावी ठरू शकते, याचा अभ्यास केला जात आहे. फेब्रुवारी महिन्यात अमेरिकेतील न्यायालयात 'मेटा'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकेरबर्ग यांनी त्यांच्या कंपनीच्या दीर्घकाळ चालत आलेल्या धोरणाचा आधार घेतला. त्यात १३ वर्षांखालील वापरकर्त्यांना त्यांच्या कोणत्याही प्लॅटफॉर्मचा वापर करण्यास परवानगी दिली जात नाही. मात्र काही अंतर्गत संशोधन आणि कागदपत्रे सादर करण्यात आली, तेव्हा त्यातून लहान मुले या प्लॅटफॉर्मचा वापर करत होती, हे स्पष्ट झाले.



'यूट्युब' या व्हिडीओ-शेअरिंग वेबसाइटचे मालक म्हणून 'गूगल'देखील या प्रकरणात प्रतिवादी होते, तरीही खटल्यातील बहुतेक सुनावणी इंस्टाग्राम आणि मेटावर केंद्रित राहिली. या प्रकरणात सुरुवातीला स्नॅप इंक आणि टिकटॉकचाही समावेश होता; मात्र दोन्ही कंपन्यांनी खटल्यापूर्वीच काही अटींवर समझोता केला. मुलांवर या समाजमाध्यमांच्या दुष्परिणामांबाबत मेटा आणि इतर 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म्सविरोधात आणखी एक खटला जून महिन्यात कॅलिफोर्नियामधील न्यायालयात सुरू होणार आहे.

'सोशल मीडिया' च्या अनियंत्रित वापरामुळे किशोरांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे हे गेल्या काही वर्षांमध्ये हे स्पष्ट झाले आहे. नैराश्य, चिंता, आत्मसन्मानात घट आणि आत्महत्येच्या प्रवृत्तींमध्ये वाढ यासारखे गंभीर प्रश्न याच्याशी संबंधित आहेत. आभासी जगात 'लाइक्स' आणि 'फॉलोअर्स' मिळवण्याच्या स्पर्धेमुळे वास्तविक जीवनातील मूल्ये मागे पडली आहेत. किशोरवयीन मुले स्वतःच्या मूल्यांचे मोजमाप डिजिटल निकषांवर करू लागले आहेत, ही अत्यंत धोकादायक प्रवृत्ती आहे. याशिवाय, सायबर छळ (सायबर बुलिंग), बनावट बातम्या (फेक न्यूज) आणि अश्लील किंवा हिंसक आशय सहज उपलब्ध असल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. अशा प्रकारच्या आशयाचे योग्य मूल्यांकन करण्याइतकी परिपक्वता किशोरांमध्ये नसते. त्यामुळे सोशल मीडिया कंपन्यांवर त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील सामग्रीचे प्रभावी नियंत्रण आणि देखरेख ठेवण्याची जबाबदारी येते; मात्र आतापर्यंत या कंपन्यांनी नफ्याला प्राधान्य देत ही जबाबदारी गांभीर्याने पार पाडलेली दिसत नाही.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथील ज्यूरीने 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मच्या घातक परिणामांमुळे त्रस्त झालेल्या केली नावाच्या एका तरुणीच्या बाजूने दिलेल्या ऐतिहासिक निकालामुळे जगभरातील पालकांना दिलासा मिळाला आहे. मेटा, यूट्युब यांसारख्या प्लॅर्टफॉर्मवर ५६ कोटी

# घसरणीच्या काळातही एसआयपीवर विश्वास



अलीकडच्या काळात शेअर बाजारात मोठ्या प्रमाणात चढ-उतार पहायला मिळत आहेत. बाजार कधी अचानक तेजीत जातो, तर कधी घसरण होऊन हजारो अंकांनी खाली येतो. त्यामुळे अनेक गुंतवणूकदारांच्या मनात 'एसआयपी' थांबवावी का, असा प्रश्न निर्माण होत आहे. 'मिंट'च्या अहवालानुसार, काही गुंतवणूकदारांनी अलीकडच्या महिन्यांमध्ये 'एसआयपी' कमी किंवा बंद केली असली तरी अजूनही मोठ्या संख्येने गुंतवणूकदार नियमित गुंतवणूक करत आहेत. यावरून दीर्घकालीन गुंतवणूकदार बाजारातील चढ-उतारांकडे फारसे लक्ष देत नाहीत, हे स्पष्ट होते. बाजारात घसरण झाली किंवा अस्थिरता वाढली की घाबरणे स्वाभाविक आहे. विशेषतः जागतिक तणाव किंवा आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास डळमळीत होऊ शकतो; मात्र तज्ज्ञांच्या मते, अशा वेळी घाईत घेतलेले निर्णय नुकसानदायक ठरू शकतात. 'एसआयपी' थांबवणे योग्य नाही, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. 'वेस्टेड फायनान्स'चे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विराम शहा यांच्या मते, केवळ बाजारातील चढ-उतारामुळे 'एसआयपी' कमी किंवा बंद करणे शहाणपणाचे नाही. 'एसआयपी'चा मुख्य उद्देश अनिश्चित काळातही नियमित गुंतवणूक करणे हा आहे. त्यामुळे 'रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंग'चा फायदा मिळतो. बाजार खाली असताना अधिक युनिट्स आणि वर असताना कमी युनिट्स खरेदी केले जातात. त्यामुळे दीर्घकालीन परताव्यात सुधारणा होते.'व्हीएसआरके कॅपिटल'चे तज्ज्ञ संचालक स्वप्नील अग्रवाल यांच्या मते, बाजारातील अस्थिरतेचा काळ हा 'एसआयपी'साठी सर्वाधिक फायदेशीर असतो. घसरणीच्या काळात कमी किमतीत अधिक युनिट्स मिळतात. त्यामुळे भविष्यातील नफ्याची पायाभरणी होते. उलट, भीतीपोटी 'एसआयपी' थांबवणे तोट्याचे ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, शेअर बाजार चक्राकार पद्धतीने चालतो. कधी तेजी तर कधी मंदी येत असते; मात्र दीर्घकाळ गुंतवणूक कायम ठेवणारे गुंतवणूकदारच चांगला परतावा मिळवतात.

शिस्त आणि संयम महत्त्वाचा अल्पकालीन चढ-उतारांकडे दुर्लक्ष करून घर खरेदी, मुलांचे शिक्षण किंवा निवृत्ती नियोजन यांसारख्या दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करणे अधिक योग्य ठरते. गुंतवणूकदारांनी बाजारातील प्रत्येक हालचालीवर तत्काळ प्रतिक्रिया देणे टाळावे. स्वतःची आर्थिक परिस्थिती आणि उद्दिष्टे लक्षात घेऊन निर्णय घ्यावा. शक्य असल्यास आर्थिक सल्लागाराचा सल्ला घेऊन मजबूत गुंतवणूक योजना तयार करावी. आर्थिक स्थिती परवानगी देत असल्यास बाजार घसरल्यावर

# तोंडाच्या कर्करोगाची मुख्य लक्षणे



तोंडात किंवा जिभेवर बरा न होणारा लाल/पांढरा डाग, बऱ्या न होणारी जखम (अल्सर), गिळताना त्रास, आवाज बदलणे, दात सैल होणे आणि मानेमध्ये गाठ येणे १, २, ३. तंबाखू, गुटखा, धूम्रपान किंवा मद्यपानामुळे होणाऱ्या या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.तोंडाच्या कर्करोगाची प्रमुख लक्षणे: बरे न होणारे व्रण/जखम: तोंडात, जिभेवर, हिरड्यांवर किंवा गालाच्या आत अशी जखम जी ३ आठवड्यांपेक्षा जास्त काळ राहते आणि वेदना होत नाही.पांढरे किंवा लाल डाग: तोंडात पांढरे (ङर्शीझेश्रिरज्ञळर) किंवा लाल (एींींहीश्रिरज्ञळर) रंगाचे डाग पडणे.सतत वेदना: तोंडात किंवा घशात सतत वेदना होणे, काही वेळा कान दुखणे ६, ८.गिळताना किंवा बोलताना त्रास: अन्न गिळताना जळजळ होणे, त्रास होणे .

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

### या वयात महिला होऊन जातात अधिक रोमँटिक




सक्रिय स्त्रियांचे मानसिक, शारीरिक आरोग्य अपेक्षाकृत उत्तम दिसून आले.या महिलांसाठी सहवासमध्ये रस नसणे हा विषय काळजी करण्यासारखा मुळीच नव्हता. ६० टक्के महिला ज्या नियमित संबंध स्थापित करू पात नसल्या तरी संतुष्ट आणि खूश दिसल्या. शोधात हे देखील कळून आले की चाळिशीनंतर महिलांची सेक्स लाईफ अधिक चांगली असते. यात सामील ४५ ते ५० वयाच्या महिलांपेक्षा ८० हून अधिक वयाच्या बायका आपल्या सहवास लाईफने संतुष्ट होत्या.**(क्रमश. )**

## २ Joke विनोद




गंपू: लोक चार दिवस दारू पितात आणि म्हणतात की ,
व्यसन लागलं...
.
.
.
..
आम्ही वर्षानुवर्ष अभ्यास करतोय ,
पणव्यसन लागत नाही.....

## ३ Message संदेश



Aaj Titanic ki 95th Anniversary hai,
Isliye Sache Premi "Jack & Rose"
ki Yaad me Apne Mobile ko
Pani me 2 Minute Dibokar
Rakhen,
Unki Aatma ko Shanti Milegi...

## ४ Thought सुविचार




माणसाला सुख हवं असते पण सुख देणारे पदार्थ नको असतात. दु:ख देणारे पदार्थ हवे असतात पण दु:ख नको असते.- ओशो

**संस्कृत सुभाषित**

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते । पिपासितैः काव्यरसो न पीयते ।न च्छन्दसा केनचिदुद्धृत कुलं । हिरण्यमेवार्जय, निष्कला गुणाः

।**अर्थ :** ज्याला कडकडून भूक लागलेली आहे, त्याला व्याकरणाच्या भोजनाचा उपयोग नसतो, जो तहानलेला आहे, त्याची तहान काव्यरसाने भागत नाही (भुकेला भोजनच लागते व तहानेला पाणीच लागते), तसेच वेदांचा अभ्यास करून कुळाचा उद्धार होत नाही तर संपत्तीशिवाय (सोन्याशिवाय) सारे गुण हे निष्फळ ठरतात.

# समाचार मनोरंजक महाशब्दकोड्यांचा



## आडवे शब्द

१. सिंह
३. भडीमार
६. महालक्ष्मीची नगरी
७. सारखे खाण्याची इच्छा
८. नवरदेव
९. लाडवाचा शाही प्रकार
१०. निवासस्थान
११. दरोडेखोर
१२. आनंदावर पडल्यास मनोभंग
१४. सर्प
१६. सकस
१८. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींवरबरोबर आलेला फौजफाटा
२१. प्रत्युत्तर
२४. विष्णूपत्नी
२५. हवेतील शीतलता
२७. वैरी, दावा दाखल करणारा
२८. फटाक्यांत ठासली जाणारी
२९. दुसऱ्यावर केलेले उपकार
३०. विनिमयाचे देशानुसार बदलणारे साधन
३२. नेस्तनाबूत
३३. पांग, मेहरबानी
३५. अगदी नियमित
३८. दगा, हानी
४०. कवितेतील एक शब्दालंकार
४१. ही केवळ 'र' ला 'ट' जुळवल्याने होत नाही!
४४. बारीकसारीक
४७. शरम
४९. उलटीपूर्वीची अवस्था
५१. आवडता, प्रिय
५२. गवत कापण्याचे, उपटण्याचे साधन
५५. दुमड घातलेली करंजी
५८. कुरकूर, अतिश्रम
५९. ध्यान लावणारा पक्षी
६१. देवालयातील गाभारा भरून टाकणारा आवाज
६२. वेळी-अवेळी, रात्री-अपरात्री
६४. गव्हाचे बारीक पीठ
६५. नाश्तापाणी
६६. आरतीसाठीचे वाद्य
६७. पुरुषश्रेष्ठ
६८. लक्ष्मीनारायण

## उभे शब्द

१. पिवळसर रंगाचे काटेरी सुगंधी पान
२. मंत्रीमंडळ
३. महाशिरात्रीचा महिना
४. सीतेला पळवून नेणारा
५. अफूचे बी
६. कारल्याची चव
६अ. नैसर्गिक भुयार
७. हिंदीत खत
७अ. आचारी
९. रात्रभर
१०. हल्ली हे दिवस केवळ गोंगाट आणि खरेदीचे!
१३. पाणी
१५. समाजातील प्रतिष्ठा
१६. थडगे
१७. रक्त देणे
१९. सैन्यातील एक हुद्दा
२०. किल्लीचा जोडीदार
२१. विविध प्रकाराने
२२. जागृत
२३. अर्थसंकल्प
२६. लायब्री (मराठी)
३१. केसांची बट
३४. आकाशपोकळी
३५. शेवट करणे, तडीस नेणे (वा.प्र.)
३६. विचार, हेतू
३७. सौनग वठवणारा
३९. सावकार, श्रीमंत
४२. निर्मळ
४३. हा सगळ्यांनीच सोडल्यास बेबंदशाही!
४५. अस्थि
४६. सततचे नाकारणे
४८. लोक, प्रजा
५०. औरंगाबादची प्रसिद्ध वास्तु- 'बीबी का ----'
५३. मृत्यूचा राजा
५४. तारणारा
५६. केशकर्तनालयातील साधन
५७. शाश्वत
६०. कातरलेले तुकडे
६३. शिवाय, वाचून
६४. चालू दिवस
६५. स्वाद, रूची
६५अ. रचल्यास ढीग

## आडवे उत्तर

१.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

## उभे उत्तर


१.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.परोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५अ.रास






जर्मनीतील लेव्हरकुसेन येथे बुंडेसलिगा फुटबॉलच्या पहिल्या विभागाच्या सामन्यात स्पर्धा करताना बायर ०४ लेव्हरकुसेन आणि वोल्फ्सबर्ग संघाचे खेळाडू.

# आयपीएलः २०२६तुषार देशपांडेमुळे राजस्तानचा शानदार विजय



अहमदाबाद : नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या रोमांचक सामन्यात राजस्तान रॉयल्सने गुजरात टायटन्सवर ६ धावांनी मात केली. एकवेळ गुजरातचा विजय सोपा वाटत होता, कारण त्यांनी विजयासाठी शेवटच्या १२ चेंडूत केवळ १५ धावांची गरज होती. पण राजस्तानच्या जोफ्रा आर्चर आणि तुषार देशपांडेने सामना फिरवला. ६ चेंडूत गुजरा-तला विजयासाठी ११ धावांची गरज असताना तुषार देशपांडेने अतिशय अचूक गोलंदाजी केली. त्याने शेवटच्या षटकात केवळ ४ धावा खर्च करून गुजरातच्या फलंदाजांना जखडून ठेवले आणि राजस्तानच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी राजस्तान रॉयल्सच्या डावाची सुरुवात केली. त्यांनी ६.२ षटकांत पहिल्या बळीसाठी ७० धावांची भागीदारी केली, पण त्यानंतर रशीद खानने वैभव सूर्यवंशीला बाद केले. वैभव १८ चेंडूंमध्ये ३० धावा करून बाद झाला. त्यानंतर यशस्वी जैस्वाल कागिसो रबाडाच्या गोलंदाजीवर बाद झाला. जैस्वालने ३६ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि तीन षटकारांसह ५५ धावांची शानदार खेळी केली. राजस्तान रॉयल्सने कर्णधार रियान परागच्या रूपाने आपली तिसरा बळी गमावला, जो प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर ८ धावांवर बाद झाला.यानंतर ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायर यांनी ३० धावांची भागीदारी केली, जी अशोक शर्माने मोडली. शिमरॉन हेटमायर १८ धावा करून बाद झाला, पण जुरेल दुसर्या टोकाला खेळत राहिला आणि त्याने वेगाने धावा केल्या. त्याने ४२ चेंडूंमध्ये ५ चौकार आणि ५ षटकारांसह ७५ धावा करून बाद झाला. रवींद्र जडेजा ७ धावांवर नाबाद राहिला, ज्यामुळे राजस्तान रॉयल्सला २२० धावांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

गुजरात टायटन्सकडून कागिसो रबाडाने २ बळी घेतले. सिराज, अशोक शर्मा, प्रसिद्ध कृष्णा आणि रशीद खान यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.२११ धावांचा पाठलाग करताना गुजरातच्या डावाची सुरुवात अडखळत झाली असली, तरी सलामीवीर साई सुदर्शनने अप्रतिम फलंदाजी करत संघाचा डाव सावरला. सुदर्शनने अवघ्या ४४ चेंडूत ७३ धावांची तुफानी खेळी केली, ज्यामध्ये ९ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता. रवी बिश्नोईने त्याला बाद करून राजस्थ-ानला मोठे यश मिळवून दिले. जोस बटलर (२६) आणि कुमार कुशाग्र (१८) यांनी चांगली सुरुवात केली, पण त्यांना मोठी धावसंख्या उभारता आली नाही. मध्यफळीत राहुल तेवतिया (१२), शाहरुख खान (११) आणि कर्णधार रशिद खान (२४) यांनी फटकेबाजीचा प्रयत्न केला, पण राजस्तानच्या शिस्तबद्ध गोलंदाजीपुढे त्यांचे प्रयत्न तोकडे पडले. कागिसो रबाडा २३ धावांवर नाबाद राहिला, मात्र शेवटच्या षटकात गुजरातला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. राजस्तानच्या विजयाचा खरा शिल्पकार ठरला तो लेग स्पिनर रवि बिश्नोई. बिश्नोईने ४ षटकांत ४१ धावा देत गुजरातच्या ४ महत्त्वाच्या फलंदाजांना तंबूत धाडले. त्याला नांद्रे बर्गर, तुषार देशपांडे आणि कर्णधार रियान पराग यांनी प्रत्येकी १ बळी घेत चांगली साथ दिली. जोफ्रा आर्चरने बळी घेतली नसली तरी ४ षटकांत फक्त ३८ धावा दिल्या.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### आयपीएल २०२६ चा आजचा सामना होणार रद्द?

**मुंबई** –आयपीएल २०२६ मधील १२वा सामना आज कोलकाता नाइट राइडर्स आणि पंजाब किंग्स यांच्यात रंगणार असून, हा मुकाबला कोलकात्यातील ईडन गार्डन्स मैदानावर खेळवला जाणार आहे. या सामन्याकडे सर्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे. एका बाजूला कोलकाता संघ पहिल्या विजयाच्या शोधात मैदानात उतरणार आहे, तर दुसऱ्या बाजूला पंजाब किंग्सची टीम सलग तिसऱ्या विजयासाठी जोर लावणार आहे. मात्र, कोलकात्याच्या हवामानामुळे चाहत्यांची चिंता वाढली आहे. कोलकाता नाइट राइडर्स आणि पंजाब किंग्ससाठी हवामान एक आव्हान ठरू शकते. हवामान विभागाच्या मते, हवामानाचा ख्खीं–इँख्ए सामन्यावर परिणाम होऊ शकतो. शहरात दिवसभर ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असून, पावसाची शक्यता आहे. पावसासोबतच, सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेमुळेही सामन्यात व्यत्यय येऊ शकतो. सायंकाळी ७:०० ते ८:०० च्या दरम्यान पुढील तासात ती ५० टक्क्यांपर्यंत वाढेल

ममी काही मशीन नाही..

### धडाकेबाज कामगिरीनंतर म ोहम्मद शमीचा टीकाकारांवर हल्लाबोल, भविष्यातील प्लॅनही सांगितला

मुंबई ६ एप्रिल (पीएसआय)

लखनौ सुपर जायंट्सचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात शानदार कामगिरी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. रविवारी (५ एप्रिल) हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, शमीने अचूक गोलंदाजी करत केवळ नऊ धावा देऊन दोन बळी घेतले. शमीने आपल्या गोलंदाजीच्या स्पेलमध्ये एकूण १८ निर्धाव चेंडू टाकले, जे सामन्याचे कलाटणी देणारे ठरले. लखनौ सुपर जायंट्सने हा सामना पाच गडी राखून जिंकला आणि या हंगामातील आपला पहिला विजय नोंदवला. सामनावीर तोच ठरला.

### आयपीएल मध्ये भुवनेश्वर कुमारची मडबल

सेंच्युरीफ; मअशीफ कामगिरी करणारा पहिला खेळाडू

बंगळुरु ६ एप्रिल (पीएसआय)

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघाचा वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारनं इंडियन प्रीमियर लीग २०२६ मध्ये चेन्नई सुपर किंग्स विरुद्धच्या सामन्यात एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. रविवार ५ एप्रिल रोजी बंगळुरु येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भुवनेश्वरनं आयुष म्हात्रेला बाद करुन २०० आयपीएल बळींचा टप्पा गाठला.

२०० विकेट घेणारा दुसरा गोलंदाज : आयपीएलमध्ये २०० बळींचा टप्पा गाठणारा भुवनेश्वर कुमार हा दुसरा गोलंदाज आहे. यापूर्वी हा पराक्रम केवळ युझवेंद्र चहलनं केला होता, ज्यानं १७६ आयपीएल सामन्यांमध्ये २२४ बळी घेतले आहेत. विशेष म्हणजे चहलनं हा पराक्रम लेग स्पिनर म्हणून केला आहे, जी टी–२० क्रिकेटमधील सर्वात धोकादायक भूमिका मानली जाते. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर सुनील नरेन आहे, ज्याच्या नावावर १९३ आयपीएल बळी आहेत. नरेनची कामगिरी यासाठीही लक्षणीय आहे कारण त्यानं आपले सर्व बळी एकाच संघाकडून, कोलकाता नाईट रायडर्स कडून घेतले आहेत.

पहिला वेगवान गोलंदाज : भुवनेश्वर कुमार आयपीएलमध्ये २०० बळी घेणारा पहिला वेगवान गोलंदाज ठरला आहे. इंडियन प्रीमियर लीगमध्ये बळी घेणं कधीच सोपं नसतं, विशेषत: अशा फॉरमॅटमध्ये जिथं फलंदाज सुरुवातीपासूनच आक्रमक असतात. असं असूनही, या गोलंदाजांनी सातत्यानं चांगली कामगिरी करुन स्वत:ला सामना–विजेते म्हणून सिद्ध केलं आहे.

नवीन चेंडूनं बळी घेण्याचं वैशिष्ट्य : नवीन चेंडूनं बळी घेणं हे भुवनेश्वर कुमारचं वैशिष्ट्य राहिलं आहे. पॉवरप्ले आणि डेथ ओव्हर्स या दोन्हीमध्ये प्रभावीपणे गोलंदाजी करण्याची त्याची क्षमता त्याला आणखी खास बनवते. भुवनेश्वरची टी–२० आंतरराष्ट्रीय कारकीर्दही शानदार राहिली आहे. त्यानं या फॉरमॅटमध्ये भारतासाठी ९० बळी घेतले आहेत. या फॉरमॅटमधील भारताच्या सर्वात यशस्वी गोलंदाजांच्या यादीत भुवी सातव्या क्रमांकावर आहे. आयपीएलमध्ये सर्वाधिक बळी घेणारे गोलंदाज :

# पिंकाथॉनमध्ये ४,५०० हून अधिक महिलांचा सहभाग



पुणे : सात वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा दिमाखात परतलेल्या 'झायडस पिंकाथॉन पुणे'ने रविवारी ऋचउ मैदानावर ४५०० हून अधिक महिलांना एकत्र आणले. या सोहळ्याने शहराची धावण्याची सुदृढ संस्कृती आणि महिलांचे आरोग्य व तंदुरुस्ती यांप्रती वाढती कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली. पहाटेच्या वेळी सुरू झालेल्या या स्पर्धेत ३ किमी, 'लाईफलाँग' ५ किमी आणि १० किमी अशा शर्यतींच्या श्रेणींचा समावेश होता; तसेच ५० किमी, ७५ किमी, १०० किमी आणि १०० किमी रिले अशा 'अल्ट्रा-डिस्टन्स' (अति-दीर्घ अंतराच्या) शर्यतीही यात घेण्यात आल्या. या स्पर्धेत विविध वयोगट, क्षमता आणि तंदुरुस्तीच्या विविध पातळ्यांवरील सहभागींचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ पुणे शहराच्या सन्माननीय महापौर श्रीमती मंजुषा नागपुरे, 'पिंकाथॉन'चे संस्थापक मिलिंद सोमण आणि 'इन्व्हिन्सिबल वुमेन'च्या संस्थापिका अंकिता कोंवर यांसारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. महिलांचे आरोग्य, सुरक्षा आणि सक्रिय जीवनशैलीला चालना देणारी एक शहरव्यापी चळवळ म्हणून या कार्यक्रमाचे महत्त्व याप्रसंगी अधोरेखित करण्यात आले. याच भावनेचे प्रतिबिंब म्हणून, या कार्यक्रमात अत्यंत उत्सा-हपूर्ण सहभाग दिसून आला; ज्यामध्ये पहिल्यांदाच धावणार्या नवख्या धावपटूंनी अनुभवी आणि दीर्घ पल्ल्याच्या शर्यतींमध्ये पारंगत असलेल्या खेळाडूंसोबत एकाच मार्गावर धाव घेतली. या कार्यक्रमाच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये २० दृष्टिहीन धावपटू, ५० हून अधिक कर्करोगावर मात करणारे व्यक्ती, ३ किलोमीटरच्या गटात आपल्या बाळांना सोबत घेऊन धावणार्या १५ माता आणि आयुष्यभर तंदुरुस्तीचा ध्यास जोपासणारे ज्येष्ठ नागरिक यांचा समावेश होता. या सर्वांनी मिळून 'पिंकाथॉन'ची सर्वसमावेशकता आणि जनसहभागाप्रती असलेली कटिबद्धता अधिकच दृढ केली. पुणे येथील या धावण्याच्या शर्यतीला एक आगळीवेगळी ओळख मिळवून देण्याचे काम, प्रत्येक श्रेणीचे प्रतिनिधित्व करणार्या 'मॅस्कॉट्स'च्या (प्रतीक-व्यक्तींच्या) एका दमदार फळीने केले.

पारंपरिक नऊवारी साडी नेसून 'सुपर ७५ किमी' गटात धावणार्या मृणाल इनामदार यांनी सांस्कृतिक सामर्थ्य आणि चिकाटीचे मूर्तिमंत रूप साकारले, तर दृष्टीहीन धाव-पटू ललिता पवार यांनी ५० किमी गटाचे नेतृत्व केले. १०० किमी अंतराच्या गटाचे प्रतिनिधित्व ६१ वर्षीय ईएनटी (कान-नाक-घसा) तज्ज्ञ डॉ. नीलम वैद्य यांनी केले; त्यांनी वयाच्या कोणत्याही टप्प्यावर टिकून राहणार्या जिद्दीचे प्रतीक म्हणून आपली छाप पाडली. कमी अंतराच्या गटांमध्ये, कर्करोगावर मात केलेल्या डॉ. मिताली उपाध्ये यांनी १० किमी शर्यतीचे प्रतिनिधित्व केले; ८७ वर्षीय उषा सोमण यांनी 'लाईफलाँग ५ किमी' गटाचे नेतृत्व केले; आणि आपल्या बाळाला सोबत घेऊन धावणार्या मयूरी दास यांनी ३ किमी गटाचे प्रतिनिधित्व केले. या सर्वांनी मिळून 'पिंकाथॉन' चळवळीतील विविधता आणि तिचा चैतन्यमय उत्साह प्रभावीपणे अधोरेखित केला.स्पर्धेच्या निकालांमध्ये, ३ किमी गटात पियुषा लोहारने १३ मिनिटे २० सेकंदांच्या वेळेसह प्रथम क्रमांक पटकावला; तिच्या पाठोपाठ ओवी पाटील आणि मायरा मोनिका साठे यांनी स्थान मिळवले. 'लाईफलाँग ५ किमी' शर्यतीत कृतिका चव्हाणने २३ मिनिटे ३४ सेकंदांच्या वेळेसह प्रथम क्रमांक मिळवला, तर वंदना ठाकूर आणि सारिका यादव यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावून विजेत्यांच्या यादीत स्थान निश्चित केले. १० किमी शर्यतीत निशा पासवान ४१ मिनिटे ४९ सेकंदांच्या वेळेसह विजयी ठरली; तिच्या पाठोपाठ पद्मा करांडे आणि अभिलाषा मोडेकर यांनी शर्यत पूर्ण केली.

कार्यक्रमानंतर बोलताना, 'पिंकाथॉन'चे संस्थापक मिलिंद सोमण म्हणाले, पुणे हे नेहमीच धावण्याच्या संस्कृतीसाठी ओळखले जाणारे शहर राहिले आहे आणि आज आम्हाला प्रत्यक्ष मैदानावर या संस्कृतीचे रूपांतर एका अविश्वसनीय ऊर्जेमध्ये झालेले पाहायला मिळाले. या कार्यक्रमाची केवळ भव्यताच नव्हे, तर त्यातील विविधताही विशेष लक्षवेधी ठरली, ज्यामध्ये पहिल्यांदाच ३ किमी धावण्याचा प्रयत्न करणार्या महिलांपासून ते 'अल्ट्रा-डिस्टन्स' धावण्याचे आव्हान स्वीकारणार्या महिलांपर्यंत सर्वांचा समावेश होता. सात वर्षांनंतर झालेले हे पुनरागमन या उपक्रमाला अधिकच अर्थपूर्ण बनवते; कारण यातून हे सिद्ध होते की, आरोग्याला प्राधान्य देण्याची जिद्द किंवा उद्देश अजिबात मावळलेला नाही, उलट तो अधिकच दृढ झाला आहे.

### माजी टेनिसपटू लिएंडर पेसला एक्स श्रेणीची सुरक्षा प्रदान

दिल्ली,६ एप्रिल (पीएसआय)

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षात सामील झालेल्या माजी टेनिसपटू लिएंडर पेसला केंद्रीय गृह मंत्रालयाने मएक्सफ श्रेणीची सुरक्षा प्रदान केली आहे. आता पेसच्या संरक्षणासाठी सीआयएसएफचे जवान तैनात केले जातील.

लिएंडर पेस हे भारतीय टेनिसमधील सर्वात मोठ्या नावांपैकी एक असून ते देशभरात लोकप्रिय आ-हेत. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत ते महत्त्वाची भूमिका बजावतील अशी अपेक्षा आहे. त्यांना प्रचारासाठी राज्यभर प्रवास करावा लागू शकतो. त्यांच्या सुरक्षेच्या चिंतेचे मूल्यांकन केल्यानंतर, गृह मंत्रालयाने त्यांना मएक्सफ श्रेणीची सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे. मएक्सफ श्रेणीच्या सुरक्षेमध्ये कमांडोंना वगळून दोन सशस्त्र पो-लीस कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाचा समावेश असतो. लिएंडर पेस अलीकडेच भारतीय जनता पक्षात सामील झाले आहेत. भाजपमध्ये सामील झाल्यानंतर पेस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली.

## सूर्याचे झंझावाती अर्धशतक

नवी दिल्ली : आयपीएल स्पर्धेतील दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्यात हार्दिक पांड्याच्या जागी कॅप्टन्सीची जबाबदारी खांद्यावर पडलेल्या सूर्यकुमार यादवनं संकटात सापडलेल्या मुंबई इंडियन्सला सा-वरणारी खेळी केली. अरुण जेटली स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सच्या संघाने सलामीवीर रायन रिकल्टन आणि तिलक वर्माच्या रुपात अवघ्या १८ धावांवर दोन बळी गमावल्या.

संघ अडचणीत असताना सूर्यकुमार यादव आणि रोहित शर्मा जोडी जमली. रोहित शर्माला अक्षर पटेल याने ३५ धावांवर चालते केल्यावर सूर्यानं अर्धशतक साजरे केले. सूर्यकमार यादवनं ३६ चेंडूत ३ चौकार आणि २ षटारांच्या मदतीने ५१ धावांची खेळी साकारली. आयपीएल कारकिर्दीतील ३० वे अर्धशतक झळकावल्यावर अखेरच्या षटकापर्यंत मैदानात थांबून तो दिल्ली कॅपिटल्ससमोर आव्हानात्मक धावसंख्या उभारणारी खेळी करेल, असे वाटत होते.

## पांड्याच्या जागी सूर्या मुंबई इंडियन्सचा कर्णधार

स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांच्यात आयपीएल स्पर्धेतील यंदाच्या हंगामातील १९ वा सामना रंगल्याचे पाहायला मिळाले. दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडियमवरील सान्यात मुंबई इंडियन्सवर कर्णधार बदलण्याची वेळ आली. नियमित कर्णधार हार्दिक पांड्याच्या जागी सूर्यकुमार यादव टॉसला मैदानात उतरला. दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमार यादव नाणेफेकीला आला. त्याच्यासमोर अक्षर पटेलनं नाणेफेकीचा कौल जिंकत पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टॉसवेळी सूर्यकुमारने सांगितले की, हार्दिक पांड्या आजारी असल्यामुळे त्याला विश्रांती देण्यात आली आहे. आज त्याच्या जागी मी




नेतृत्व करत आहे. संघात सकारात्मकता आहे. आम्हाला आधी फलंदाजी करायची होती. पिच चांगली दिसते. दीपक चाहर, बॉश आणि सँटनर यांच्यासह मैदानात उतरत असल्याचेही त्याने स्पष्ट केले.

मुंबई इंडियन्स विरुद्धच्या सामन्यात टॉस जिंकल्यानंतर दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल म्हणाला की, मी प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. घरच्या मैदानावरचा हा पहिला सामना आहे, त्यामुळे पिच कशी आहे ते पाहायचं आहे. विकेट थोडी कोरडी आणि कठीण वाटते. मागील सामन्यात आम्ही धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. त्यामुळे संघात आत्मविश्वास आहे. वरच्या फळीतील फलंदाज अपयशी ठरले तरी खालच्या क्रमांकावरचे खेळाडू योगदान देऊ शकतात. घरच्या मैदानावर खेळणे नेहमीच फायदेशीर असते आणि आमचे चाहते आम्हाला साथ देतील. आम्ही तोच संघ कायम ठेवला आहे.

# चेन्नई सुपर किंग विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स : विराट कोहली सहज बाद

बंगळुरु : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु विरुद्ध चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात रविवारी रंगलेल्या आयपीएलच्या सामन्यात चेन्नईचा गोलंदाज अनशुल कंबोज याने चकविणारा चेंडू टाकत कोहली याला अवघ्या २८ धावांवर असताना शिवम दुबे याच्याकडे झेलबाद केले.तर त्यानंतर लगेचच बंगळुरुचा सलामीवीर फिल सॉल्ट याला ४६ धावांवर असताना शिवम दुबे याने शानदार चेंडू टाकत नूर अहमद याच्याकडे झेलबाद केले. त्यामुळे फिल सॉल्ट याचे अर्धशतक हुकले. त्यानंतर पड्डीकल ५० धावां करून बाद झाला.बंगळुरुच्या संघाने आयपीएलमधील पहिल्या सामन्यात शानदार सुरुवात केली होती. रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध ६ बळीने एकतर्फी विजय मिळवला होता. चेन्नई आणि बंगळुरू यांच्यातील या सामन्याबद्दल चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. आरसीबीने आपल्या अधिकृत सोशल मीडियावरून तिकीट विक्रीची माहिती दिली आहे. या सामन्याची तिकीट विक्री सुरू झाली आहे. तिकीट फक्त आरसीबीच्या अधिकृत वेबसाइट आणि मोबाइल ॲपवरच उप-लब्ध आहेत.कोणत्याही अनधिकृत प्लॅटफॉर्मवरून तिकीट खरेदी करू नये, असेही स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. आरसीबीच्या सामन्याचे वैध तिकीट असलेल्या प्रेक्षकांना सामना दिवशी मेट्रोने मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे.

तिकीटावरील कोड स्कॅन करून तुम्हाला मेट्रो प्रवास करता येईल. आरसीबीच्या अधिकृत वेबसाइटवर, सर्वात स्वस्त तिकीट 'बोट सी स्टँड'साठी ३,७५० आहे. सर्वात महाग तिकीट 'नथिंग (आर) प्लॅटिनम लाउंज'साठी २५,००० आहे. तसेच, एका वेळी फक्त दोनच तिकिटे बुक करता येतील असेही नमूद केले आहे.



# महावितरणकडून ‘इकॅमेक्स-२०२६’मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

## केंद्रीय राज्यमंत्री श्री. नाईक यांनी केले कौतुक

**सोलापूर/प्रतिनिधी :** इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इकॅम) वतीने गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये ‘इकॅमेक्स-२०२६’ या तीन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महावितरणच्या प्रदर्शनीला केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री मा. श्री. श्रीपाद नाईक यांनी भेट शनिवारी (दि. ४) भेट दिली व विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली.

गोरेगाव येथे ‘इकॅमेक्स-२०२६’चे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन श्री. नाईक यांनी केले.

तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे. सौर ऊर्जेच्या योजनांद्वारे सद्यस्थितीत २० लाख ६६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरु झाला आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतल्याचे श्री. पवार यांनी सांगितले. केंद्रीय राज्यमंत्री ना. श्री. नाईक यांनी प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनाला भेट दिली आणि विविध योजना, उपक्रमांची माहिती घेत कौतुक केले. त्यांचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांनी स्वागत केले व माहिती दिली. यावेळी विशेष कार्य अधिकारी श्री. सुधन्वा पत्की (नवी दिल्ली), इकॅमचे अध्यक्ष श्री. देवांग ठाकूर, सरचिटणीस श्री. अमरनाथ पाटील आदींची उपस्थिती होती.

या तीन दिवसीय प्रदर्शनीत महावितरणचे मुख्य अभियंता श्री. पंकज तगलपल्लेवार आणि विद्युत सुरक्षा मोहिमेचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी यांनी सोमवारी (दि. ६) विशेष सत्रात विद्युत सुरक्षेबाबत प्रबोधन केले. महावितरणच्या अभियानामध्ये सहभागी होत ग्राहक संवादाद्वारे विद्युत सुरक्षेचा जागर करण्याची ग्वाही यावेळी इकॅमच्या वतीने देण्यात आली.

महावितरण प्रदर्शनीद्वारे अधीक्षक अभियंता श्री. संजय खंदारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. भारत पवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र राठौर यांच्यासह अभियंता, अधिकाऱ्यांनी महावितरणच्या विविध योजना व विद्युत सुरक्षेसंदर्भात नागरिकांना माहिती दिली.




## शिक्षकांनी समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करावे प्राचार्य डी. एन. केंद्रे



**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षक हा समाजाचा आरसा असतो. शिक्षकांकडून समाजाला मोठ्या अपेक्षा असतात. शिक्षकांनी समर्पणाच्या भावनेतून ज्ञानदानाचे कार्य करणे हे समाज आणि राष्ट्र निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले.

एज्युकॉन पुरस्काराने केंद्रे दाम्पत्याचा सन्मान करण्यात आल्याबद्दल येथील संगमेश्वर विद्यामंदिरच्यावतीने राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्ष के. ए. जायेभाये यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य केंद्रे म्हणाले, शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवणारे नसून, ते विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणारे शिल्पकार असतात. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ गुणात्मात शिक्षण न देता सुसंस्कार, राष्ट्रप्रेम व सामाजिक मूल्यांची शिकवण द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## राजा नारायणलाल लाहोटी शाळेत ‘स्वरपौर्णिमा’ उपक्रमांतर्गत संगीत मैफिल

**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या संगीतकलेला प्रोत्साहन देण्यासाठी ‘स्वरपौर्णिमा’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. दर पौर्णिमेला सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. चैत्र पौर्णिमा व हनुमान जयंतीच्या निमित्ताने सहावी स्वरपौर्णिमा संगीत मैफिल उत्साहात पार पडली.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु व रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती अरुल सेल्वी यांनी भूषवले. उपक्रमाची संकल्पना सौ. देवयानी देशपांडे यांनी मांडली.

संगीत मैफिलीत विद्यार्थ्यांनी विविध भक्तिगीते सादर केली. आरुष अग्रवाल, प्रिशा सोनी आणि सार्थ अग्रवाल यांनी हनुमान चालिसा गायन केले. माहिषा विपत, रिचा शहाणे व काव्या चौधरी यांनी ‘रामचंद्र कृपालु’ हे गीत सादर केले. अनिका झंवर व कनक तोष्णीवाल यांनी ‘पायो जी मैने’ हे गीत गायले. मानसी ठाकरे आणि अनघा बिडवे यांनी ‘कभी राम बनके कभी श्याम बनके’ हे गीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

यावेळी आदित्य पाटील याने शंखवादन सादर केले. शाळेतील शिक्षक कौस्तुभ जोशी यांनी ‘नादातून या नाद निर्मितो’ ही रामस्तुती सादर केली. कार्यक्रमाचा समारोप शिक्षिका गीता मुंडे यांच्या गीताने झाला.

विद्यार्थ्यांना संगीत विभागातील शिरीष देशपांडे, गीता मुंडे, कौस्तुभ जोशी व कृष्णा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानवी उगिले व श्रेया चाकोते यांनी केले.

या कार्यक्रमाला मनोहर कबाडे, बी. के. भालेराव, आशिद बनसोडे, संदीप केंद्रे, सुनील मुनाळे, वर्षा खुंटेगावे, मंजुषा भोसले, मनीषा मगर, दर्शन देशपांडे यांच्यासह कर्मचारीवृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येत्या ८ एप्रिल रोजी डिजिटल शेती शाळा भाग-२; जैविक व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीचे मिळणार धडे

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ८ एप्रिल, २०२६ रोजी सायंकाळी ७:३० वाजता डिजिटल शेती शाळा भाग-२ चे आयोजन करण्यात आले आहे. १ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या सत्राला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर, आता दुसऱ्या सत्रामध्ये जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन या विषयावर विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. या सत्रात शेतकरी बांधवांना घरच्या घरी बीजामृत, जीवामृत, घन जीवामृत, लिंबोळी अर्क आणि दशपर्णी अर्क यांसारख्या उपयुक्त निविष्ठा तयार करण्याचे प्रगत तंत्रज्ञान शिकायला मिळणार असून, या निविष्ठांचे फायदे आणि वापराबाबतही सखोल माहिती दिली जाणार आहे.

# निलंगा तालुक्यात दोन दुचाकींच्या धडकेत २ तरुणांचा मृत्यू, सुसाट वेगाचे ठरले बळी

### उरुसाला निघालेल्या लेकाचा प्रवास ठरला अखेरचा, दोन कुटुंबांचा आधार हरपला

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा तालुक्यातील कवठा पाटी ते तुपडी मार्गावर रविवारी दुपारी काळाने घातलेल्या भीषण झडपेने दोन हसते-खेळते संसार उद्ध्वस्त झाले. दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत शिऊरचा सोहेल रहीम शेख (२२) आणि गौरचा अमर सुनील झाला. देशमुख (३०) या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू





उरुसाच्या आनंदासाठी निघालेल्या या प्रवासाचा शेवट इतका भीषण असेल, याची पुसटशी कल्पनाही कुणाला नव्हती. शिऊर येथील सोहेल हा आपल्या कुटुंबाचा एकुलता एक आधार होता. तो ऑनलाइन सेंटर चालवून आपल्या आई-वडिलांच्या स्वप्नांना बळ देत होता. तुपडी येथे सुरू असलेल्या मक्कामाँ दर्गाहच्या उरुसासाठी त्याची आई आणि बहीण आधीच आजोळी पोहोचल्या होत्या. त्यांना भेटण्यासाठी आणि उरुसाचा आनंद घेण्यासाठी सोहेल मोठ्या उत्साहात निघाला होता, मात्र वाटेतच काळाने घाला घातला आणि कुटुंबाचा आधार कायमचा हिरावला गेला.

**तुपडीत आई पाहात होती वाट**

सोहेलची आई आणि बहीण तुपडी येथे आपल्या लाडक्या लेकाची वाट पाहत होत्या. सोहेल येईल आणि आपण एकत्र उरूस साजरा करू, ही आशा धुळीस मिळाली. सोहेलच्या मृत्यूची बातमी पोहोचताच शिऊर गावावर शोककळा पसरली.

**दोन घरांचे दीप विझले**

दुसरीकडे, गौर गावचा अमर देशमुख हा शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. तो तुपडीवरून आपल्या घराकडे परतत असताना हा भीषण अपघात झाला. सोहेलचा जागीच मृत्यू झाला, तर अमरने लातूरच्या रुग्णालयात जीव सोडला.

# सरकारच्या योजना गरजूपर्यंत पोहोचवून भाजपाचे अंत्योदयाचे स्वप्न पूर्ण करावे

### भाजपा प्रशिक्षण शिबिरात आ. रमेशआप्पा कराड यांचे अवाहन




**लातूर/प्रतिनिधी :** या ३६५ दिवस २४ तास जनतेच्या सुखदुःखात सहभागी व्हावे, जनसामान्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारने सुरू केलेल्या अनेक महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ प्रत्येक घटकातील गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करून जनसंघापासून भाजपचे देशासाठी असलेले अंत्योदयाचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी रेणापूर येथे बोलताना केले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण अभियाना अंतर्गत रेणापूर पिंपळफाटा येथील शामराव आकनगिरे कॉम्प्लेक्स येथे आयोजित रेणापूर शहर मंडल प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या प्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे, जिपच्या महिला बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, पंसचे उपसभापती शरद दरेकर, संगायो समिती अध्यक्ष सतीश आंबेकर, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, माजी सभापती अनिल भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षण वर्गात १३० भाजपाच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुखांनी सहभाग घेतला.

भाजपाचा कार्यकर्ता हा पक्ष संघटनेचा कणा आहे तर प्रशिक्षित कार्यकर्ता हा भाजपाच्या विचारधारेची ताकद आहे. येत्या पाच - पंचवीस वर्षांसाठी कार्यकर्त्यांची वैचारिक फळी निर्माण करणे हा या अभियानाचा उद्देश असल्याचे सांगून यावेळी बोलताना भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, नेतृत्व जरूर करावे मात्र त्याआधी पक्षाचा विचार समजून घेऊन आचरणात आणणे गरजेचे आहे. भाजपा पक्ष जगातील सर्वात मोठा असून पक्षा पेक्षा कोणीही मोठे नाही. केंद्र आणि राज्यशासनाच्या योजनांचा समाजातील प्रत्येक वंचित गोरगरीब नागरिकाला लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून योजनेचा लाभ, योजनाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा मदत करावी, असेही आवाहन त्यांनी केले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी विविध सर्वांगीण हिताच्या योजना प्रभावीपणे राबवून रेणापूर तालुका भाजपाचा बालेकिल्ला निर्माण केला याची जाणीव ठेवून भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पक्षाची शिस्त पाळावी, जबाबदारी लक्षात घ्यावी, अपयश का आले याचा विचार करून अपयशातून यशाकडे जाण्यासाठी पुन्हा एकदा पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करावी असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलून दाखवले.

या प्रशिक्षण शिबिरात वैचारिक अधिष्ठान, भाजपाचा इतिहास, कार्यपद्धती, भाजपा सरकारची कामगिरी आणि अंमलबजावणी, सोशल मीडिया यासह विविध विषयावर सुरज शिंदे, दिलीप पाटील, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण जाधव, नवनाथ मुरकुटे यांच्यासह इतर अनेकांनी प्रभावी मनोगत व्यक्त केले. प्रत्येक सत्रात सत्रप्रमुख म्हणून मान्यवरांची उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिराचा समारोप मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले आणि वसंत करमूडे यांनी केला.

## किनगाव येथील मेंदूविकार तपासणी शिबिरात ७६ जणांवर उपचार; ३ महिन्यांच्या औषधांचे मोफत वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथे दिव्यांगजनांसाठी विशेष मेंदूविकार आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ७६ रुग्णांवर प्रत्यक्ष उपचार करून त्यांना पुढील ३ महिन्यांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधांचे मोफत वितरण करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय संचलित संवेदना प्रकल्प (हरंगुळ बु.) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. देवाशिष रुईकर, माजी जिल्हा परिषद सदस्य त्रिंबकअप्पा गुट्टे आणि किनगावचे प्रभारी सरपंच विठ्ठलराव बोडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जाधव, डॉ. विठ्ठल घुगे आणि जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यवस्थापक बसवराज पैके यांची प्रमुख उपस्थिती होती.

या तपासणी शिबिरात एकूण ११० दिव्यांग रुग्णांनी आपली नावनोंदणी केली होती. त्यापैकी ७६ रुग्णांची सखोल तपासणी करून तज्ज्ञांमार्फत उपचार निश्चित करण्यात आले. या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे केवळ तपासणीवर न थांबता रुग्णांना पुढील तीन महिन्यांचा औषधी पुरवठा जागेवरच उपलब्ध करून देण्यात आला. आरोग्य सुविधेसोबतच प्रशासकीय कामांचा निपटारा करत ४० जणांचे निरामय आरोग्य विमा कार्ड तयार करण्यात आले, तर ३० दिव्यांग व्यक्तींच्या नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे जमा करून घेण्यात आली. या शिबिरात किनगावसह अंधोरी, सताळा तसेच अहमदपूर, उदगीर व चाकूर परिसरातील रुग्णांनी व त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. रवीना कलवले, औषध निर्माता बुके यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रातील सामाजिक कार्य शाखेचे विद्यार्थी आणि संवेदना प्रकल्पाचे प्रतिनिधी सचिन राऊत, राजेश्वरी भडके, कृष्णा पोतदार, लक्ष्मण वाघमारे, सूर्यकांत सुरवसे व प्रथमेश पांचाळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

## दिशा अभियानात लातूर जिल्ह्यातील चार शाळांचा राज्यस्तरावर गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** दिशा अभियानाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल लातूर जिल्ह्यातील चार शाळांची राज्य स्तरावर निवड करण्यात आली आहे. या निवडीचे प्रमाणपत्र जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते संबंधित मुख्याध्यापकांना प्रदान करण्यात आले.

या अभियानाअंतर्गत लातूर येथील संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांचे बालगृह, जीवन विकास प्रतिष्ठान मतिमंद विद्यालय, पांडूरंग निवासी मतिमंद विद्यालय आणि चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील संत गाडगेबाबा निवासी मतिमंद विद्यालय या शाळांचा समावेश आहे. वर्षभरात अभ्यासक्रम व अध्यापनात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल मुख्याध्यापक अण्णासाहेब कदम, भरत देवकते, शिवप्रसाद भंडारे आणि पंडित लव्हरे यांना राहुलकुमार मीना यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

हे यश मिळवताना या शाळांनी विविध निकष पूर्ण केले आहेत, ज्यामध्ये शालेय वेळापत्रकाचे पालन, शिक्षक व विद्यार्थी पुस्तिकांचा प्रभावी वापर, शैक्षणिक साहित्याचा विनियोग आणि शिकवण्याची बहुउद्देशीय पद्धत यांसारख्या बाबींचा समावेश होता. या निकषांची परिपूर्ण पूर्तता केल्यामुळेच जिल्ह्यातील या चार शाळा पात्र ठरल्या आहेत. या गौरव सोहळ्याप्रसंगी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता डॉ. राजू गायकवाड, सहायक सल्लागार बाळासाहेब वाकडे आणि दिशा अभियानचे लातूर विभागीय समन्वयक साजिद मुल्ला यांची उपस्थिती होती.



# शिवलीच्या विकास कामाला निधीची कमतरता पडू देणार नाही - आ. कराड

## हनुमान मंदिर सभा मंडपाचा आ. कराड यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

**लातूर/प्रतिनिधी :** असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिवली येथील जागृत श्री हनुमान देवस्थानच्या कृपा आशीर्वादाने आपण विधानसभेचा आमदार झालो, या शिवली गावच्या सर्वांगीण विकास कामासाठी निधीची कसलीही कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी दिली.





लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील भादा सर्कलमधील शिवली येथील जागृत देवस्थान श्री हनुमान मंदिर परिसरात पंधरा लक्ष रुपये खर्च करून आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या भव्य सभा मंडपाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते रविवारी भक्तिमय वातावरणात करण्यात आले. याप्रसंगी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, पद्माकर चिंचोलकर, संदिपान शेळके, शरद दरेकर, ॲड. दशरथ सरवदे, उद्धव काळे, बालाजी शिंदे, राजकिरण साठे, शिवराज राठोड, गुणवंत कारंडे, अच्युत ईरपे, सोमनाथ पावले, महादेवअप्पा गुरुशेट्टे, प्रदीप शिंदे, देवराव मोहिते, रविंद्र पाटील, महादेव आळणे, व्यंकट रसाळ यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. कराड यांचे शिवली गावात आगमन होताच टाळ मृदंगाच्या गजरात भक्तीमय वातावरणात फटाक्याची आतिषबाजी करून गावकऱ्यांनी जोरदार स्वागत केले. याप्रसंगी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, यापूर्वी विधान परिषदेचा मी आमदार होतो त्यावेळी हनुमान मंदिराच्या सभा मंडपासाठी १५ लक्ष रुपयाचा निधी दिला त्यातून आज भव्य सभागृह उभे राहिले असून शिवलीच्या मारुती रायाच्या कृपा आशीर्वादाने आणि आपल्या सर्वांच्या सहकार्याने विधानसभेचा आमदार झालो. येत्या काळात शिवली गावातील सर्वच मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करीन असे सांगून शिवली गावच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास शिवली आणि परिसरातील भाविक भक्त महिला पुरुष भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते शेषेराव कांबळे यांचे निधन



**निलंगा/प्रतिनिधी :** आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते, निलंगा नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष तसेच अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष शेषेराव (तात्या) कांबळे (वय ८०, रा. मिलिंद नगर, निलंगा) यांचे रविवारी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे आहेत. कांबळे यांनी आयुष्यभर आंबेडकर चळवळीचे मूल्य जपत समाजातील वंचित, दुर्बल घटकांसाठी झटत राहिले. आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात रिपब्लिकन पार्टी (गवई गट) मधून केली. त्यानंतर डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वाखाली तब्बल सहा दशके प्रामाणिक काँग्रेस कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहिले. जनतेने त्यांच्यावर ठेवलेल्या विश्वासामुळे ते दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले. नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष म्हणून त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. भारतीय बौद्ध महासभा, निलंगा तालुक्याचे संस्कार उपाध्यक्ष आयु. इंद्रजीत कांबळे यांचे ते सासरे होत.

## मल्लिकार्जुन स्वामी यांचे निधन



**लातूर/प्रतिनिधी :** चाकूर तालुक्यातील कलकोटी पंचक्रोशीत स्वामी महाराज म्हणून ओळखले जाणारे मल्लिकार्जुन शंकर स्वामी (वय ८४) यांचे रविवार, ५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने लातूर येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी ९ वाजता श्री सिद्धेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. पोलिस कर्मचारी महारुद्र स्वामी व रत्नाकर स्वामी यांचे वडील होत.

### विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालयात मेंदूतील ॲन्युरिझमवर यशस्वी शस्त्रक्रिया

## ७० वर्षीय महिलेला मिळाले नवजीवन

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय अतिविशेषोपचार रुग्णालयातील डॉक्टरांनी मेंदूतील अत्यंत गुंतागुंतीच्या आणि जीवघेण्या ॲन्युरिझम या आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया करून एका ७० वर्षीय महिला रुग्णाचे प्राण वाचविले आहेत. या यशस्वी उपचारामुळे शासकीय रुग्णालयातील अत्याधुनिक न्युरोसर्जरी सुविधा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

संबंधित रुग्ण महिला डोकेदुखी, उलट्या आणि अचानक शुद्ध हरपणे अशा गंभीर तक्रारींसह रुग्णालयात दाखल झाली होती. तातडीने करण्यात आलेल्या सिटी स्कॅन व एंजिओग्राफी तपासणीत रुग्णाच्या मेंदूतील अँटेरियर कम्युनिकेटिंग आर्टरीमध्ये ॲन्युरिझम फुटल्याचे निदान झाले. ॲन्युरिझम म्हणजे मेंदूतील रक्तवाहिन्या कमकुवत होऊन तयार झालेला फुगवटा. हा फ ुगवटा फुटल्यास मेंदूत रक्तस्राव होऊन मृत्यूचा मोठा धोका असतो.

रुग्णाची गंभीर प्रकृती पाहता न्युरोसर्जरी विभागाने तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. नितीन बर्डे व त्यांच्या तज्ज्ञ पथकाने ॲन्युरिझम क्लिपिंग ही अत्यंत जटिल शस्त्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेत फुगलेली रक्तवाहिनी सुरक्षितपणे क्लिप करून रक्तस्राव थांबविण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर आयसीयूमध्ये न्युरोसर्जरी आणि बधिरीकरणशास्त्र विभागाच्या समन्वयाने रुग्णाची विशेष काळजी घेण्यात आली.

ही यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडण्यात विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर, न्युरोसर्जरी विभागप्रमुख डॉ. हनुमंत किनीकर, डॉ. नितीन बर्डे, डॉ. शीतल अग्रोया, डॉ. संगिता कदम, डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर, डॉ. निखिला सुभाषिनी, डॉ. वैजनाथ फड, डॉ. बुमेश्वरी तसेच बधिरीकरणशास्त्र विभागाचे डॉ. विनायक शिरसाठ, विभागप्रमुख डॉ. संगिता आगळे, डॉ. संतोष चिंचकर, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. साईनाथ कुंटे, डॉ. आरती काचेकर व डॉ. सेल्वामूर्ती यांच्या पथकाचा समावेश होता. यावेळी उप अधिष्ठाता डॉ. उमेश कानडे, डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. अजय ओव्हाळ, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड आणि डॉ. महादेव बनसुडे यांची उपस्थिती होती.

मोफत उपचारांचे आवाहन

या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली असून नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले आहेत. लातूरमध्येच अशा उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्याने आता गंभीर रुग्णांना मोठ्या शहरात जाण्याची गरज कमी झाली आहे. गरजू रुग्णांनी अशा शस्त्रक्रियांचा लाभ महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेच्या माध्यमातून मोफत घ्यावा, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी केले आहे.

## नेतृत्व विकास शिबिरात महाराष्ट्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा यशस्वी सहभाग

**निलंगा/प्रतिनिधी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय युवक व युवती नेतृत्व विकास शिबिर आणि उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्वविकास शिबिरात यशस्वी सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक कार्य करण्यासाठी नेतृत्व विकास महत्त्वाचा असतो. त्यासाठी काही कौशल्ये आत्मसात करावी लागतात, यासाठी जिल्हा व विद्यापीठ पातळीवर अशा नेतृत्व विकास शिबिरांचे आयोजन केले जाते. या शिबिरात महाविद्यालयातील सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर यांच्या हस्ते अभिनंदन व सत्कार करण्यात येऊन त्यांना भावी काळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, सांस्कृतिक विभागाचे डॉ. हंसराज भोसले, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरूद्र बदनाळे यांची उपस्थिती होती.



## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी महेश म्हेत्रे यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील तांबरावाडी येथील युवा नेते महेश शोभाबाई लहू म्हेत्रे यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मा. शिवराज मोरे यांच्या स्वाक्षरीने त्यांचे नियुक्तीपत्र नुकतेच जारी करण्यात आले आहे. महेश म्हेत्रे यांच्या निवडीमुळे प्रदेश युवक काँग्रेसमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात संघटन विस्ताराला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



महेश म्हेत्रे यांची ही नियुक्ती त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी संघटनात्मक कामगिरीची पावती मानली जात आहे. युवक काँग्रेसमध्ये त्यांनी तळागाळापासून काम करत आपले नेतृत्वगुण सिद्ध केले आहेत. २०२३ साली प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी राज्य पातळीवर विविध उपक्रम, बैठका आणि संघटनात्मक मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आपला ठसा उमटवला आहे. तसेच, पक्षाच्या राष्ट्रीय स्तरावरील विविध महत्त्वाच्या मोहिमांमध्येही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली असून युवकांच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवला आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे युवक कार्यकर्त्यांमध्ये त्यांचे नेतृत्व अधिक बळकट झाले आहे. या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आगामी काळात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस अधिक सक्षम करण्यासाठी तसेच युवकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## फ्रेंडलिमिट ..

वाढदिवस शुभेच्छा
प्रेम उतू जाई अपार
फेसबुक फ्रेंडलिमिट
केंव्हाचंझालीय पार

भावनीक मुद्दा एका
दुजांस दिसे व्यापार
जीव जडे माझ्यावर
प्रेम भरता अपरंपार

प्रत्यक्ष मित्र तुरळक
ऑनलाइन चिक्कार
काही जण करतात
रे ऑनलाईन सत्कार

वाढदिवस शुभ दिन
घडे अनेक चमत्कार
हसत शुभेच्छा घ्यावी
सुट्टीवरी तो अहंकार

आभासीजगाचे कसे
सहजी होतो शिकार
प्रत्यक्ष मित्र दुरावले
अप्रत्यक्ष यार विकार

दिलखुलास वागायचे
खोलायचे मनाचे दार
भेटी गाठी माणसांची
रोखीत कशांस उधार

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

## बसवेश्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या अध्यक्ष पदी ॲड. निलेश सुरेशआप्पा मुचाटे तर उपाध्यक्ष पदी विश्वास प्रभूआप्पा अंबेकर यांची निवड



**लातूर/प्रतिनिधी :** दि. ५ एप्रिल २०२६ रोजी जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२६ च्या वतीने महालक्ष्मी मंदिर गांधी चौक येथे आयोजित केलेल्या बैठकीत लातूर शहरातील सर्व लिंगायत समाज बांधव यांच्या साक्षीने सदरील निवड करण्यात आली.

तसेच सर्व समाज बांधवांच्या सहमतीने अध्यक्ष यांची निवड करताना अनुमोदक नितीन दादा मोहनाळे,जगदिश येरटे व सुचक महेश कोळ्ळे तसेच समितीच्या सचिव पदी बालाजीआप्पा झिपरे सहसचिव रोहीतआप्पा चवळे कोषाध्यक्ष लखन कावळे कार्याध्यक्षपदी मुकेश उटगे, गणेश हेरकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सदरील निवड करत असताना उपस्थित चंद्रकांतआप्पा बावगे, ओमआप्पा धरणे, बसवेश्वरजी हेंगणे, नागेशजी उटगे, धुळप्पा अरबळे, सुशील वेळापुरे, धीरज रंजिले,सागर वाघमारे,मंगेशजी पाटील, आनंदजी स्वामी, ओमप्रकाशजी झुरळे,किरणजी खोबरे, संकेतजी उटगे, विरेश वाले, विकास स्वामी, सुनिल ताडमाडगे, अमित खराबे, प्रसाद जगताप, शंकर खोबरे, विकास धरणे, अशिष बोंडगे, संताजी यादव,नारायण गवळी, ॲड.बंटी हालकुडे, रणजितजी मानकरी,आकाश महाजन,राहूल नारगुंडे,निखिल शेटकार, प्रतिक स्वामी,कुणाल गिरवलकर आदी लिंगायत बांधव उपस्थित होते.

तरी समितीचे अध्यक्ष यांनी असे जाहीर आवाहन केले आहे कि जयंतीची पुढील रूपरेषा ठरविण्यासाठी सदरील बैठक ही पचशे घर मठ आझाद चौक लातूर येथे लवकरात लवकर होणार आहे तरी सर्व समाज बांधव यांनी जास्तीत जास्त संख्येने बैठकीला उपस्थित रहावे..


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६